SAMPLE CONTENT

# मराठी अक्षरभारती

# IQB Important Question Bank

Based on New Paper Pattern of Maharashtra State Board




STD. X

(ENG. MED.)

Target Publications Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे - ४११००४
यांच्याद्वारे नियोजित नवीन अभ्यासक्रमावर आधारित

# मराठी अक्षरभारती
# IQB Important Question Bank

इयत्ता दहावी

**ठळक वैशिष्ट्ये:**

- कमीत कमी वेळेत परीक्षेचा अधिकाधिक सराव.
- प्रश्नोत्तरांची गुणनिहाय मांडणी.
- कृतिपत्रिकेच्या प्रारूपानुसार प्रश्नांची रचना.
- भाषाभ्यासातील व्याकरणिक व भाषिक घटकांवर आधारित मुबलक कृती.
- उपयोजित लेखनाच्या उत्तम सरावासाठी कृतींचा समावेश.
- स्वयंमूल्यमापनासाठी कृतिपत्रिका समाविष्ट.

या पुस्तकात समाविष्ट **Q. R. Code** स्मार्टफोनद्वारे स्कॅन करून कृतिपत्रिका प्रारूपाचे विवेचन करणारे, तसेच कवितांचे भावार्थ कथन करणारे व्हिडिओज् पाहता येतील. तसेच नमुना कृतिपत्रिकेच्या खाली दिलेला **Q. R. Code** स्कॅन करून कृतिपत्रिकेची उत्तरसूचीही पाहता येईल.

SAMPLE CONTENT

Printed at: **India Printing Works,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

P.O. No. 126409

TEID: 12781_JUP

# प्रस्तावना

नमस्कार, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो!

दहावीचं वर्ष म्हणजे आपल्या शैक्षणिक जीवनातला महत्त्वाचा टप्पा! या वर्षी आपल्याला शासनाने निर्धारित केलेला ज्ञानरचनावादावर आधारित नवीन अभ्यासक्रम शिकायचा आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांच्याद्वारे प्रकाशित मूल्यमापन आराखड्याचा सखोल अभ्यास करून **टार्गेट प्रकाशनाचे मराठी अक्षरभारती IQB इयत्ता दहावी** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

कमीतकमी वेळेत परीक्षेचा अधिकाधिक अभ्यास हा उद्देश ध्यानात ठेवून IQB या पुस्तकाची रचना केली आहे. विद्यार्थ्यांना कृतिपत्रिका प्रारूपाचा अधिकाधिक सराव व्हावा यासाठी संपूर्ण अभ्यासक्रमाची गद्य, पद्य, स्थूलवाचन, भाषाभ्यास व उपयोजित लेखन अशी विभागवार मांडणी केली आहे. प्रत्येक पाठातील निवडक परिच्छेद घेऊन त्यावर गुणांनुसार कृतींचा उत्तरांसहित समावेश केला गेला आहे. पद्य विभागात कवितेच्या अधिक आकलनासाठी प्रत्येकी दोन कृतिसंच देण्यात आले आहेत. ‘काव्यपंक्तींचे रसग्रहण’ या शीर्षकाखाली प्रत्येक पद्याच्या रसग्रहणावर आधारित कृतींचा समावेश केला गेला आहे. ‘स्थूलवाचन’ विभागात गुणांनुसार सर्व प्रश्न सोडवून दिले आहेत.

व्याकरण हा भाषेचा पाया समजला जातो, हे लक्षात ठेवून ‘भाषाभ्यास’ विभागात व्याकरणिक व भाषिक घटकांवर आधारित विविध कृतींचा मुबलक प्रमाणात समावेश केलेला आहे. कृतिपत्रिकेच्या या नवीन प्रारूपामध्ये ‘उपयोजित लेखन’ हा सर्वाधिक गुणांसाठी विचारला जाणारा विभाग आहे. त्यामुळे, या विभागात विविध लेखनप्रकारांचा आदर्श उत्तरांसहित अंतर्भाव करण्यात आला आहे; जेणेकरून विद्यार्थ्यांची लेखनशैली विकसित होईल. ‘कृतिपत्रिकेचे प्रारूप अधिक सुस्पष्ट व्हावे व स्वयंमूल्यमापन करता यावे याकरता नमुना कृतिपत्रिकेचा समावेशही यात करण्यात आला आहे. कृतिपत्रिका प्रारूपाचे स्पष्टीकरण व सर्व कवितांचे विश्लेषण यांचे व्हिडिओज तसेच नमुना कृतिपत्रिकेची उत्तरसूची Q. R. Code मार्फत देण्यात आली आहे.

SAMPLE CONTENT

प्रयत्नांती परमेश्वर! चला ... नियोजनबद्ध अभ्यासाला सुरुवात करूया, नवीन अभ्यासक्रमाला आत्मविश्वासाने सामोरे जाऊया, तुमच्या प्रयत्नांत आम्ही सदैव तुमच्या सोबतच आहोत.

हे पुस्तक परिपूर्ण करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत, तरी पुस्तक अधिकाधिक उत्कृष्ट व्हावे, यासाठी आपल्या सूचना स्वागतार्ह आहेत. याकरता आपला अभिप्राय mail@targetpublications.org या इमेल पत्त्यावर पाठवावा ही नम्र विनंती.

**धन्यवाद!**

**ज्ञानार्थींना मन:पूर्वक शुभेच्छा!**

**प्रकाशक**

**आवृत्ती:** प्रथम

SAMPLE CONTENT

## Disclaimer

This reference book is transformative work based on textual contents published by Bureau of Textbook. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents, the Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

**कृतिपत्रिका आराखडा (गुणविभागणीसह)**
**मराठी – द्‌वितीय भाषा (अक्षरभारती)**
**इयत्ता दहावी**

**एकूण गुण: १००**

## घटकनिहाय गुणविभागणी

| अनु. क्र | विभाग | गुण | विकल्प गुण |
|---|---|---|---|
| १ | गद्य | २४ | – |
| २ | पद्य | २० | – |
| ३ | स्थूलवाचन | ६ | ३ |
| ४ | भाषाभ्यास | २० | – |
| ५ | उपयोजित लेखन | ३० | १३ (१३+३=१६) |
| | एकूण गुण | १०० | ११६ (विकल्पासह) |

## कृतिपत्रिका आराखडा

**विभाग १ : गद्य** **एकूण गुण २४**

**(अ) १ पठित उतारा**
**(आ) १ पठित उतारा**
**(इ) १ अपठित उतारा**

(शब्दसंख्या १३० ते १५०) **प्रत्येकी ८ गुण**

**८ गुणांसाठी कृतिनिहाय विभागणी:**

(१) आकलन कृती – २ गुण

(२) आकलन कृती – २ गुण

(३) व्याकरण कृती – २ गुण

दिलेल्या परिच्छेदात इयत्ता पहिली ते इयत्ता नववीच्या व्याकरण घटकांवर आधारित असणाऱ्या कृती येणे अपेक्षित आहे.

(सर्व घटकांवर आधारित कृती विकल्पाने देणे आवश्यक आहे.)

(४) स्वमत – २ गुण

SAMPLE CONTENT

**विभाग २ : पद्य** **एकूण गुण २०**

**(अ) १ पठित पद्य** } **प्रत्येकी ८ गुण**

**(आ) १ पठित पद्य**

**('अ' व 'आ' या दोन्ही घटकांसाठी पाठ्यपुस्तकातील प्रत्येकी एक कविता कृतिपत्रिकेत दिली जाईल.)**

**८ गुणांसाठी कृतिनिहाय गुणविभागणी:**

(१) आकलन कृती – २ गुण

(२) आकलन कृती – २ गुण

(३) काव्यसौंदर्य कृती – ४ गुण

१. विचारसौंदर्य

२. भावसौंदर्य

३. अर्थसौंदर्य

} **(या ३ घटकांपैकी कोणत्याही दोन घटकांवर २ कृती २/२ गुणांच्या दोन कृतीअपेक्षित.)**

**(इ) काव्यपंक्तींचे रसग्रहण: ४ गुण**

**पाठ्यपुस्तकात समाविष्ट असलेल्या पद्यांपैकी कोणत्याही एका पद्यातील रसग्रहणास अनुकूल अशा दोन ओळी कृतिपत्रिकेत देणे.**

*** दिलेल्या काव्यपंक्तींचे रसग्रहण करणे.**

**विभाग ३ : स्थूलवाचन (विकल्प गुण ३)** **एकूण गुण ६**

**प्रत्येकी ३/३ गुणांच्या २ कृती**

(स्वमत व अभिव्यक्तीवर आधारित कृती)

(पाठाचा आशय, शालाबाह्य जीवनाशी सांगड घालणारा आशय, मूल्य, जीवनकौशल्य यांवर आधारित ३ कृती देण्यात येतील, त्यांपैकी २ कृती सोडवणे अपेक्षित.)

**विभाग ४ : भाषाभ्यास** **एकूण गुण २०**

**(अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती** **एकूण १० गुण**

(१) **समास** – अव्ययीभाव, द्‌वंद्‌व, द्‌विगू – २ गुण

(२) **अलंकार** – यमक, अनुप्रास, उपमा, उत्प्रेक्षा – २ गुण

(३) **वाक्य रूपांतर** – प्रश्नार्थक, विधानार्थी, उद्‌गारार्थी, आज्ञार्थी, होकारार्थी, नकारार्थी – २ गुण

(४) **सामान्यरूप** – २ गुण

(५) **वाक्प्रचार** – २ गुण

SAMPLE CONTENT

**(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती** **एकूण १० गुण**

(भाषासौंदर्य/ भाषिक समृद्धी)

**(१) शब्दसंपत्ती** — ४ गुण

(१) समानार्थी शब्द

(२) विरुद्धार्थी शब्द

(३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द

(४) एका शब्दाचे अनेक अर्थ/अर्थछटा

(५) शब्दातील अक्षरांपासून शब्द बनवा.

(प्रत्येकी १/२ गुणांची कृती अपेक्षित) शब्दसंपत्तीच्या घटकांपैकी कोणत्याही ४ घटकांवर प्रत्येकी १/२ गुणांची कृती विचारली जाईल.

**शब्दसंपत्तीशी संबंधित वरील घटकांपेक्षा वेगळी कृती कृतिपत्रिकेत विचारली जाऊ शकते.**

**(२) लेखननियमांनुसार लेखन** — २ गुण

(१) अचूक शब्द ओळखा.

(२) वाक्य लेखननियमांनुसार लिहा.

(प्रत्येक अचूक शब्दाला १/२ गुण, वाक्यातील चुकीच्या शब्दाच्या दुरुस्तीसाठी प्रत्येकी १/२ गुण)

**(३) विरामचिन्हे** — २ गुण

(१) योग्य विरामचिन्हे वापरा.

(२) चुकीची विरामचिन्हे बदला.

**(४) पारिभाषिक शब्द/प्रचलित मराठीतील शब्द** — १ गुण

(गद्य, पद्य या दोन्ही विभागांतील घटकांवर आधारित)

(प्रत्येकी १/२ गुणांसाठी २ कृती)

**(५) अकारविल्हे/ भाषिक खेळ** — १ गुण

(किमान ४ वर्ण अकारविल्हे लावणे)

[**टीप** — विभाग ४ : व्याकरण घटकांतर्गत दिलेल्या कृती या नमुन्यादाखल आहेत. सृजनशील कृतींची नावीन्यपूर्ण रचना करता येणे शक्य आहे.]

**विभाग ५ : उपयोजित लेखन एकूण गुण ३०**

**(अ) विभाग** **एकूण गुण १०**

(१) पत्रलेखन — ५ गुण

(अंतर्गत विकल्प २ पैकी १ पत्र सोडवणे) — **विकल्प गुण ५**

औपचारिक (मागणी, विनंती) अनौपचारिक (कौटुंबिक)

SAMPLE CONTENT

(२) सारांशलेखन – ५ गुण (१०० ते १२० शब्दांचा गद्य उतारा)

**(आ) विभाग** **विकल्प नाही.एकूण गुण १२**

(१) जाहिरात लेखन (५० ते ६० शब्द) – ६ गुण
(२) बातमी लेखन (५० ते ६० शब्द) – ६ गुण
(३) कथालेखन (८० ते १०० शब्द) – ६ गुण

(३ घटकांपैकी कोणत्याही २ घटकांवर कृती विचारणे. दोन्हीही कृती सोडवणे अपेक्षित आहे.)

**(इ) लेखनकौशल्य** (१०० ते १२० शब्द) **विकल्प गुण ८ एकूण गुण ८**
(निबंध)

(१) प्रसंगलेखन
(२) आत्मकथन
(३) कल्पनाप्रधान लेखन

(३ घटकांपैकी कोणत्याही २ घटकांवर कृती विचारली जाईल. त्यांपैकी कोणतीही एक कृती सोडवणे अपेक्षित आहे.)

[**संदर्भ**: महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे निर्मित मूल्यमापन आराखडा]

**[सूचना:** नवीन अभ्यासक्रमावर आधारित कृतिपत्रिकेच्या प्रारूपाचे सुयोग्य आकलन होण्याकरता शेजारील **Q. R. Code** स्कॅन करून व्हिडिओ पाहा.**]**

SAMPLE CONTENT

# अनुक्रमणिका


| | विभाग १ – गद्य (एकूण २४ गुण) | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| प्र.१. (अ)/(आ) | पठित गद्य उतारे (१६ गुण) | १ |
| प्र.१. (इ) | अपठित गद्य उतारे (८ गुण) | ४० |
| | **विभाग २ – पद्य (एकूण २० गुण)** | |
| प्र.२. (अ)/(आ) | आकलन व काव्यसौंदर्यावर आधारित कृती (१६ गुण) | ५२ |
| प्र.२. (इ) | काव्यपंक्तींचे रसग्रहण (४ गुण) | ७७ |
| | **विभाग ३ – स्थूलवाचन (एकूण ६ गुण)** | |
| प्र.३. | स्थूलवाचन (६ गुण) | ९५ |
| | **विभाग ४ – व्याकरण (एकूण २० गुण)** | |
| प्र.४. (अ) | व्याकरण घटकांवर आधारित कृती (१० गुण) | १०६ |
| प्र.४. (आ) | भाषिक घटकांवर आधारित कृती (१० गुण) | १३३ |
| | **विभाग ५ – उपयोजित लेखन (एकूण ३० गुण)** | |
| प्र.५. (अ) | पत्रलेखन व सारांशलेखन (१० गुण) | १६२ |
| प्र.५. (आ) | जाहिरातलेखन, बातमीलेखन, कथालेखन (१२ गुण) | १७९ |
| प्र.५. (इ) | लेखनकौशल्य (८ गुण) | १९७ |
| | **नमुना कृतिपत्रिका** | २११ |


**सूचना:** १. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पाठांचे व पद्यांचे क्रमांक पाठ्यपुस्तकानुसार ठेवण्यात आले आहेत.

२. पाठाखाली दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.

३. सुलभतेच्या दृष्टीने येथे आकृतिबंधावर आधारित कृतींमध्ये (१/२/३/४) असे अनुक्रमांक देऊन उत्तरे देण्यात आली आहेत. परीक्षेत असे क्रमांक देण्यात येणार नाहीत. परीक्षेत सूचनेनुसार आकृती काढणे अपेक्षित आहे.

SAMPLE CONTENT

विभाग १

# गद्य

## पठित गद्य उतारे - प्रश्न १ (अ)/(आ)

### प्रश्नाचे स्वरूप

कृतिपत्रिकेत गद्य विभागात **प्र.१.(अ) आणि (आ)** मध्ये प्रत्येकी साधारणत: १३० ते १५० शब्दांचे दोन पठित उतारे देण्यात येतील. प्रत्येक उताऱ्यावर ८ गुणांच्या कृती विचारण्यात येतील. यामध्ये विकल्प (Option) देण्यात येणार नाही. या ८ गुणांची कृतीनिहाय विभागणी व त्यात विचारण्यात येणारे प्रश्नप्रकार पुढीलप्रमाणे:

**१. आकलन कृती** **२ गुण**

**२. आकलन कृती** **२ गुण**

वरील दोन्ही कृतींमध्ये 'आकृती पूर्ण करा', 'चौकटी पूर्ण करा', 'ओघतक्ता पूर्ण करा', 'तक्ता पूर्ण करा', 'एका शब्दांत उत्तर लिहा', 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा', 'योग्य जोड्या जुळवा', 'कारणे लिहा', 'घटनेचा / कृतीचा परिणाम लिहा', 'एका वाक्यात उत्तर लिहा', '_ असे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा', 'तुलना करा', 'फरक लिहा' यांसारख्या वैविध्यपूर्ण कृतीपैकी कोणत्याही कृती विचारल्या जाऊ शकतील.

**३. व्याकरण कृती** **२ गुण**

या कृतीमध्ये दिलेल्या परिच्छेदात आलेल्या इयत्ता पहिली ते नववीच्या व्याकरण घटकांवर आधारित कृती विचारण्यात येतील.

**४. स्वमत** **२ गुण**

विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणारे, अभिव्यक्ती क्षमता व विचारांची मांडणी जोखणारे प्रश्न येथे विचारण्यात येतील.

**लक्षात ठेवा:**

१. दिलेला उतारा दोन वेळा वाचा.

२. सर्व कृती काळजीपूर्वक वाचा.

३. उत्तरांना योग्य क्रमांक द्या.

४. परीक्षेत आकलन व व्याकरणावर आधारित आकृती पेनने काढणे अपेक्षित आहे.

५. 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा / योग्य पर्याय निवडा' ह्या कृतीच्या उत्तरात विद्यार्थ्यांनी पूर्ण विधान लिहिणे अपेक्षित आहे.

६. 'योग्य जोड्या जुळवा' या कृतीच्या उत्तरात प्रत्यक्ष जोडी लिहिणे अपेक्षित आहे.

SAMPLE CONTENT

# पाठ ३ : शाल

## उतारा १

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. i. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

*अ. सभासंमेलने गाजवणारे कवी [ ]

ब. सुर्वेंचा मुळातील स्वभाव [ ]

**ii. खालील आकृती पूर्ण करा.** **(१)**

[१] — **कविवर्य नारायण सुर्वे यांना प्रत्येक कार्यक्रमात मिळणाऱ्या गोष्टी** — [२]

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ७ वरील (ओळ क्र. १२ ते २१) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[कविवर्य नारायण सुर्वे ............................ धोकाच मोठा आहे.]**

**२. i. एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

खरीखुरी शालीनता कशी शोभते?

***ii. कारण शोधून लिहा.** **(१)**

लेखकाच्या मते शालीमुळे शालीनता जाते, कारण.....

**३. व्याकरण**

**कंसातील सूचनेप्रमाणे कृती करा.** **(२)**

i. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत आहे. (भूतकाळ करा.)

ii. पुढे वाईला विश्वकोशाचा अध्यक्ष म्हणून मी गेलो.

(अधोरेखित शब्दांची जात ओळखा व लिहा.)

**४. स्वमत** **(२)**

*'शाल व शालीनता' यांचा परिच्छेदाच्या आधारे तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. अ. कविवर्य नारायण सुर्वे    ब. शालीन

ii. १. सन्मानाची शाल    २. श्रीफळ

२. i. खरीखुरी शालीनता शालीविनाच शोभते.

ii. शाल हे सन्मानाचे प्रतीक आहे व सन्मान केल्यानंतर अनेक वेळा सन्मान मिळवणारी व्यक्ती अहंकारी बनते.

३. i. तिचे बाळ कडाक्याच्या थंडीने कुडकुडत रडत **होते.**

ii. पुढे – क्रियाविशेषण अव्यय, मी – सर्वनाम

४. शालीनता हा एक स्वभावगुण आहे, जो मुळातच व्यक्तीमध्ये असावा लागतो, तर शाल हे सन्मानाचे प्रतीक मानले जाते. व्यक्तीचा गौरव करण्याकरता श्रीफळ व शाल दिली जाते; मात्र या सन्मानाच्या रूपाने व्यक्तीला मिळालेली शाल व शालीनता यांचा संबंध असेलच असे नाही. कवी नारायण सुर्वेही हीच बाब सांगतात. शाल मिळालेली प्रत्येक व्यक्ती शालीन असेल किंवा शाल न मिळालेली प्रत्येक व्यक्ती शालीन नसेल असे होत नाही. शाल पांघरून मनाची, आचरणातील शालीनता मिळवता येत नाही. त्याचप्रमाणे मुळातच शालीन असणारी व्यक्ती शाल रूपाने सन्मान मिळवतेच असेही नाही; मात्र आपल्यातील शालीनता जपून ठेवते. त्यामुळे, ‘शाल आणि शालीनता’ यांचा विशेष संबंध असेलच असे नाही.

## उतारा २

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृतिबंध पूर्ण करा.** (२)

**ओंकारेश्वर मंदिराच्या पुलावर बसलेल्या भिक्षेकऱ्याचे वर्णन**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.८ वरील (ओळ क्र.२७ ते ४२) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[याच सुमारास मी ........................................ हायेत बाबा.”]**

२. **i. चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. परिच्छेदातून जाणवणारा लेखकाचा गुण ☐

ब. भिक्षेकऱ्याला शोभेपेक्षा अधिक महत्त्वाची वाटणारी गोष्ट ☐

***ii. खालील प्रसंगी लेखकाने केलेली कृती लिहा.** (१)

म्हातारा, अशक्त भिक्षेकरी कट्ट्याला लागूनच चिरगुटे टाकून व पांघरून कुडकुडत बसल्याचे पाहिले.

SAMPLE CONTENT

३. **व्याकरण**

**गटातील वेगळा शब्द ओळखा व तो शब्द वेगळा का आहे, यामागील कारण स्पष्ट करा.** (२)

i. दिसला, पाहिजे, उपकार, दिल्या  ii. म्हातारा, अशक्त, त्याला, बिकट

४. **स्वमत** (२)

*'भिक्षेकऱ्याने केलेला शालीचा उपयोग' याविषयी तुमचे मत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. म्हातारा  २. अशक्त

३. चिरगुटे टाकून व पांघरून बसलेला  ४. कुडकुडणारा

**२.** i. अ. औदार्य  ब. पोटाची आग

ii. लेखकाने दुसऱ्याच दिवशी त्या भिक्षेकऱ्यास दोन शाली दिल्या.

**३.** i. उपकार - 'उपकार' हे नाम असून इतर सगळी क्रियापदे आहेत.

ii. त्याला - 'त्याला' हे सर्वनाम असून इतर सगळी विशेषणे आहेत.

**४.** लेखकाने पांघरुणाशिवाय कुडकुडणाऱ्या एका भिक्षेकऱ्याला दोन शाली देऊ केल्या; मात्र भिक्षेकऱ्याने त्या शाली पांघरण्यासाठी न वापरता त्या विकल्या. त्या पैशातून त्याने दोन-तीन दिवस पोटभर जेवून घेतलं. पोटाची आग म्हणजेच भूक भागवणे आणि थंडीपासून संरक्षण या दोन्ही भिक्षेकऱ्याच्या गरजा होत्या; पण त्याच्या पोटाच्या आगीने शरीराच्या उबेवर मात केली होती. त्या उंची शालीने थंडीपासून रक्षण व्हावे असे त्या भिक्षेकऱ्यास वाटले नाही, तर त्या शालीच्या रूपात त्याला त्याचे दोन-तीन दिवसांचे पोटभर अन्न दिसले. त्यामुळेच त्याने शाली विकून आपली भूक भागवण्याचा निर्णय घेतला.

# पाठ ४: उपास

## उतारा ३

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. **i. आकृतिबंध पूर्ण करा.** (१)

**लेखकाची आस्था वाढू लागलेल्या गोष्टी**

१ | पदार्थांमधील कॅलरीज | २

SAMPLE CONTENT

**ii. खालील आकृती पूर्ण करा.** **(१)**

अ. कार्डावर लेखकाला दिसणारे वजन [ ]

ब. लेखकाला ताटातील पदार्थांऐवजी दिसणारी गोष्ट [ ]

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १० वरील (ओळ १ ते ११) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[माझ्या खाजगी ........................................ सल्ला दिला.]**

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

i. लेखकाने कोणती भीष्मप्रतिज्ञा केली?

ii. वजन कमी करण्याचा निर्णय घेताच लेखकाला कोण भेटू लागले?

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा.** **(१)**

अ. रात्रंदिवस ते कार्ड माझ्या डोळ्यांपुढे नाचत होते.

ब. मी पूर्वीसारखा गाढ झोपत नव्हतो.

**ii. 'अव' उपसर्ग लावून तयार झालेले दोन शब्द उताऱ्यातून शोधून लिहा.** **(१)**

**४. स्वमत** **(२)**

'वजन कमी करण्याकरता डाएट हा उत्तम पर्याय आहे'. या विधानाबाबत तुमचे मत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. प्रोटीनयुक्त पदार्थ  २. चरबीयुक्त द्रव्ये

ii. १. एकशे एक्क्याऐंशी पौंड  २. कॅलरीज

**२.** i. लेखकाने 'दोन महिन्यांत पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा!' अशी भीष्मप्रतिज्ञा केली.

ii. वजन कमी करण्याचा निर्णय घेताच लेखकाला वजन उतरवण्याच्या शास्त्रामध्ये पारंगत असलेले तज्ज्ञ भेटू लागले.

**३.** i. अ. डोळ्यांपुढे  ब. पूर्वीसारखा

ii. अवलक्षण, अवहेलना

४. बऱ्याच वेळा ‘डाएट’ म्हटले, की त्याचा ‘न खाणे’ किंवा ‘गरजेपेक्षा कमी खाणे’ असा चुकीचा अर्थ लावला जातो. अशा चुकीच्या प्रकारच्या ‘डाएट’ ने वजन कमी करणे शरीराला हानिकारक असते; मात्र ‘डाएट’ याचा खरा अर्थ शरीरासाठी योग्य असणारे घटक योग्य प्रमाणात घेणे. अशा शास्त्रीय पद्धतीने केलेल्या ‘डाएट’ मार्फत वजन कमी करणे नक्कीच उत्तम ठरते कारण यामध्ये शरीराला आवश्यक घटक मिळतात व आरोग्य उत्तम होते. अनावश्यक असणारे अन्नघटक टाळल्याने वजनवाढ रोखली जाते; मात्र वजन कमी करण्यासाठी फक्त डाएटवर अवलंबून न राहता, त्यासोबत व्यायाम करणेसुद्धा आवश्यक असते.

## उतारा ४

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. खालील शब्दांचे वर्गीकरण करा.** **(२)**

पडवळ, कोबी, कॉलिफ्लॉवर, भेंडी

| | सडपातळ भाज्या | | बाळसेदार भाज्या |
|---|---|---|---|
| i. | | i. | |
| ii. | | ii. | |

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.११-१२ वरील (ओळ ५२ ते ६५) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[कुटुंबाचा मात्र माझ्या .............................. का नाहीस मला?”]**

**२. कारणे शोधा व लिहा.** **(२)**

i. कुटुंबाचा लेखकाच्या ‘डाएटच्या’ बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता असे लेखकाला वाटू लागले कारण ...

ii. लेखकाला आपल्या पोटात लाखो कॅलरीज गेल्या असे वाटले कारण ...

**३. व्याकरण**

**खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती लिहून तक्ता पूर्ण करा.** **(२)**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | सुरुवातीला | ____________ | ____________ |
| २. | बिनसाखरेचा | ____________ | ____________ |

**४. स्वमत** **(२)**

लेखकाच्या कुटुंबाचा ‘डाएटच्या’ बाबतीतला उत्साह अवर्णनीय होता, असे कधी तुमच्या व्रताच्या बाबतीत घडले आहे का?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१.

| | सडपातळ भाज्या | | बाळसेदार भाज्या |
|---|---|---|---|
| i. | पडवळ | i. | कोबी |
| ii. | भेंडी | ii. | कॉलिफ्लॉवर |

२. i. रोज काही चमत्कारिक पदार्थ लेखकाच्या पानात पडू लागले होते.

ii. लेखकाने डाएट सुरू केल्यानंतरही घरातील साखर संपेपर्यंत कित्येक दिवस त्याची पत्नी त्याला बिनसाखरेचा चहा म्हणून साखर घातलेला चहा देत होती.

३.

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | सुरुवातीला | ला | चतुर्थी |
| २. | बिनसाखरेचा | चा | षष्ठी |

४. हो. दोन वर्षांपूर्वी दातदुखीने मी हैराण झालो होतो. असह्य वेदनांनी कळवळत होतो. हे सगळे अतिप्रमाणात चॉकलेट्स खाल्ल्याने झाल्याचे डॉक्टरांकडून कळले होते. त्यामुळे, चॉकलेटसारखा माझा आवडता पदार्थ न खाण्याचे व्रत मी घेतले होते. त्यावेळी घरात सर्वांनीच चॉकलेट्स किंवा त्यासारखे गोड पदार्थ खाणे थांबवले होते. घरात केकसारखे पदार्थ येणेही बंद झाले होते. वाढदिवशीही चॉकलेट्स, केक न वाटता आईने बटाटेवड्यांचा बेत केला. अशारीतीने, संपूर्ण घरच माझ्या या व्रतात उत्साहाने सहभागी झाले होते.

## उतारा ५

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** (२)

लेखकाने केलेली उग्र साधना

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. १३ वरील (ओळ १०९ ते १२१) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[पंधरवडाभरात ........................................ और गंभीर है!]**

SAMPLE CONTENT

२. i. **योग्य जोड्या जुळवा.** (१)

| | 'अ' गट | | 'ब' गट |
|---|---|---|---|
| i. | सोकाजी | अ. | कोळंबीभात |
| ii. | भाऊ पसरटवार | ब. | साखरभात |
| | | क. | नागपुरी वडाभात |

ii. **एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

उग्र साधनेनंतर लेखकाच्या वजनात कोणता फरक दिसून आला?

३. **व्याकरण**

i. **खालील वाक्यांतील क्रियापदे ओळखून लिहा.** (१)

अ. एकदा सोकाजीने चोरून कोळंबीभात चारला.

ब. पंधरवडाभरात फक्त दोन वेळाच साखरभात झाला.

ii. **खालील शब्दांचे वचन बदला.** (१)

अ. द्रव्ये ब. तिकीट

४. **स्वमत** (२)

*तुम्ही एखादा संकल्प केला आणि तो पूर्ण केला नाही, तर कुटुंबातील व्यक्ती कोणत्या प्रतिक्रिया व्यक्त करतील, याची कल्पना करून लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. एक महिन्याचा उपास २. निराहार

३. शास्त्रोक्त आहार ४. दोरीवरच्या उड्या

**२.** i. (i – अ), (ii – क)

ii. उग्र साधनेनंतर लेखकाचे वजन कमी होण्याऐवजी एकशे एक्याऐंशी पौंडावरून वाढून एकशे ब्याण्णव पौंड एवढे झाले.

**३.** i. अ. चारला. ब. झाला.

ii. अ. द्रव्य ब. तिकिटे

**४.** मी संकल्प केला; पण तो पूर्ण केला नाही ही गोष्ट माझ्या आई-वडिलांना नक्कीच आवडणारी नाही. त्यामुळे, बाबा या गोष्टीने माझ्यावर रागावतील, मला ओरडतील. आई-बाबांची प्रतिक्रिया ही नेहमीच एकमेकांना पूरक अशी असते.

SAMPLE CONTENT

त्यामुळे, बाबा रागावल्यानंतर आई मला समोर बसवून बाबांच्या रागावण्याचं कारण समजावून सांगेल. माझी चूक, त्याचे परिणाम हे सगळं ती मला पटवून देईल. एवढंच नव्हे, तर मी माझा संकल्प कसा दृढ करावा, यासाठी ती मला मार्गदर्शनही करेल; पुन्हा संकल्प करण्यासाठी प्रेरित करेल. ताईची प्रतिक्रिया मला चिडवण्याची असेलच; पण तिचं चिडवणंही मी सकारात्मक पद्धतीने घ्यावं असाच आईचा सल्ला असेल. बाबांचा धाक, आईचं प्रेमळ मार्गदर्शन आणि ताईचं गमतीदार चिडवणं हे सगळं माझ्यासाठी प्रेरणा देणारं असेल हे नक्की.

# पाठ ६: चुडीवाला

## उतारा ६

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** (२)

**चुडीवाल्याच्या येण्याने तपोवनात निर्माण होणारे वातावरण**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.१९-२० वरील (ओळ २२ ते ३२) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**["चुडीवाऽला आऽऽला, चुडीऽऽवाला आला.".... विलक्षण समाधान लाभे.]**

**२. i. एका वाक्यात उत्तर लिहा.** (१)

अब्दुलला कोणती गोष्ट लाखमोलाची वाटे?

**ii. कारण लिहा.** (१)

तपोवनात गेल्यावर अब्दुलला विलक्षण समाधान लाभे कारण ...

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये ओळखा.** (१)

अ. चौथऱ्यावर अब्दुल बसला आणि क्षणातच सारा कामधंदा सोडून स्त्रियांची गर्दी जमली.

ब. बांगड्या भरणे म्हणजे एक दिव्यच.

**ii. खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१)**

अ. स्त्री    ब. चुडीवाला

**४. स्वमत** **(२)**

*दुसऱ्याला मदत करण्यातला आनंद ज्या प्रसंगातून मिळू शकतो, असा प्रसंग लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. आवाज    २. गडबड

३. गोंधळ    ४. चेहऱ्यावरील आनंद

**२.** i. बांगड्या भरल्यानंतर तपोवनातील स्त्रियांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद अब्दुलला लाखमोलाचा वाटे.

ii. अब्दुल वर्षातून दोन वेळा, संक्रांत आणि ज्येष्ठ पौर्णिमेच्या दिवशी तपोवनातील स्त्रियांना बांगड्या भरण्याकरता जात असे. त्या दोन दिवशी तेथील स्त्रिया त्याची आतुरतेने वाट पाहत. त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून अब्दुलला विलक्षण समाधान लाभे.

**३.** i. अ. आणि    ब. म्हणजे

ii. अ. पुरुष    ब. चुडीवाली

**४.** काही दिवसांपूर्वी मी शाळेत जात असताना बाजूच्या नाल्यातून कुत्र्याच्या पिल्लाचा आवाज ऐकू आला. मी नाल्यात डोकावलो तर एक पिल्लू पाण्यात पडले होते. बाहेर पडण्यासाठी त्याची धडपड चालू होती. या धडपडीने बहुदा ते थकले असावे. त्याच्या डोळ्यांत कारुण्य दाटले होते. थंडीने ते कुडकुडत होते. त्याची ती अवस्था पाहून मला फार वाईट वाटले. मी ताबडतोब त्या नाल्यात उतरलो. गुडघ्यापर्यंत पाणी होते; मात्र मी माझ्याही सुरक्षेची काळजी घेतली. मी अलगद त्या पिलाला गोंजारले. मग त्याला हलकेच उचलून बाहेर ठेवले आणि मी नाल्यातून बाहेर आलो. बाहेर येताच ते पिल्लू पायाशी घुटमळून मला चाटू लागले. त्याच्या चेहऱ्यावरील आनंद आणि कृतज्ञता पाहून मन आनंदून गेले.

SAMPLE CONTENT

## उतारा ७

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

**i.** १ — **तपोवनात या दिवशी बांगड्या भरल्या जात** — २

**ii.** १ — **अब्दुलमियाँने केलेल्या अनमोल गोष्टी** — २

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.२० वरील (ओळ ४९ ते ६६) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[दाजीसाहेब बोलत होते – ........................ फुलदाणी त्याला दिली. ]**

**२. i. कारण लिहा.** **(१)**

अब्दुलमियाँचा तपोवनामध्ये सत्कार करण्यात आला कारण ...

**ii. एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

अब्दुलला सत्कार समारंभात काय देण्यात आले?

**३. व्याकरण**

**खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** **(२)**

i. अगदी लहानशी खार; पण तिनेसुद्धा आपल्या शक्तीप्रमाणे सेतुबंधनाला मदत केली.

ii. अब्दुलमियाँची ही मानवसेवा खरोखर फार मोठी आहे.

**४. स्वमत** **(२)**

अब्दुलमियाँचे समाजकार्य अनमोल आहे, या दाजीसाहेबांच्या विधानाशी तुम्ही सहमत आहात का? स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. संक्रांत २. ज्येष्ठ पौर्णिमा

ii. १. समाजकार्य २. मानवसेवा

**२.** i. तपोवनातील स्त्रियांना बांगड्या भरण्याकरता कोणीही तयार होत नव्हते. अब्दुलमियाँ मात्र कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न ठेवता वर्षातून दोन वेळा न

चुकता तपोवनात जात. त्या स्त्रियांना, मुलींना बांगड्या भरून त्यांना आनंद देत. त्यामुळेच, त्यांच्या या कार्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

ii. अब्दुलला सत्कार समारंभात फुलांचा गुच्छ आणि तपोवनातील लोकांनी तयार केलेली सुंदरशी फुलदाणी देण्यात आली.

३. i. लहानशी – विशेषण, सेतुबंधन – नाम

ii. खरोखर – क्रियाविशेषण अव्यय, आहे – क्रियापद

४. दाजीसाहेबांनी तपोवनातल्या स्त्रियांना बांगड्या भरण्यासाठी अनेक बांगडीवाल्यांना विनंती केली होती; पण त्यांना कोणीच प्रतिसाद दिला नव्हता. अब्दुलमियाँ मात्र दरवर्षी संक्रांतीला व ज्येष्ठ पौर्णिमेला तपोवनात जाऊन त्या स्त्रियांना बांगड्या भरून देत. ते दोन दिवस त्या स्त्रियांच्या आयुष्यात आनंद निर्माण करत. स्वत:चा स्वार्थ बाजूला ठेवून इतरांचे आयुष्य आनंदाने भरणे हे खूप मोलाचे कार्य आहे. स्वत:चा आनंद तर सगळेच जपतात; पण दुसऱ्यांना आनंद देणारे लोक क्वचितच सापडतात, म्हणूनच आपल्या कृतीने तपोवनातील भगिनींच्या आयुष्यात आनंदाचे रंग भरणाऱ्या अब्दुलमियाँचे समाजकार्य अनमोल आहे हे मला पटते.

## पाठ ७: फूटप्रिन्ट्स

### उतारा ८

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. खालील आकृती पूर्ण करा.** **(२)**

| रेखामावशींचे पाय काळे, मळकट असण्याची कारणे |
|---|
| १ |
| २ |
| ३ |
| ४ |

SAMPLE CONTENT

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २३ वरील (ओळ ५ ते १८) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[“काय हो हे, ................................... काळ्या पडल्या होत्या.]**

**२. *i. आकृती पूर्ण करा.** **(१)**

**पावडेकाकांच्या पावलांची वैशिष्ट्ये**

१ | लोण्यासारखी | २

***ii. कारण लिहा.** **(१)**

स्नेहल त्रासली कारण .....

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यांतील केवलप्रयोगी अव्यये ओळखून लिहा.** **(१)**

अ. अहो! काय लोण्यागत पाय आहेत त्यांचे!

ब. छी! किती घाण करून ठेवलेय ही फरशी!

**ii. ‘कट’ हा प्रत्यय लावून तयार झालेले दोन शब्द लिहा.** **(१)**

**उदा. मळकट**

**४. स्वमत** **(२)**

रेखामावशींचे मळकट पाय कशाची साक्ष देतात असे तुम्हांला वाटते? तुमचे मत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. त्या सतत शेणामातीत काम करतात.

२. वस्तीचा रस्ता उखणलेला असल्याने पायाला धूळ लागते.

३. सतत कामामुळे पाय धुवायला वेळ नसतो.

४. पाय धुवायला भरपूर पाणी नसते.

**२.** i. १. गोजिरी २. गुलाबी

ii. रेखामावशी फरशी पुसत असताना पुसलेल्या फरशीवर मागे त्यांच्या पायाचे काळे, मळकट ठसे उमटले होते. ते पाहून स्वच्छतेची भोक्ती असलेली स्नेहल त्रासली होती.

SAMPLE

३. i. अ. अहो! ब. छी!

ii. मातकट, धुरकट

४. रेखामावशींचे मळकट पाय हे त्यांच्या परिश्रमांची, त्यांच्या मेहनतीची साक्ष देतात असे मला वाटते. इतरांच्या घरी कष्टाची कामे करणाऱ्या रेखामावशी सतत मेहनत करतात. त्यांचा सगळा प्रवास पायी होतो. ज्या लहानशा वस्तीत त्या राहतात तिची अवस्था फारशी चांगली नाही. तेथील रस्ता, त्यावरील धूळ, त्यातून त्यांची सतत होणारी ये-जा यांमुळे त्यांचे पाय धुळीने भरून जातात. ते पाय धुण्यासाठी पुरेसे पाणीही नाही अशी अवस्था आहे. शिवाय, रेखामावशींना ते काळे, मळलेले पाय धुवायला वेळही मिळत नाही कारण त्या सतत कामात व्यस्त असतात. त्यामुळे, अत्यंत गरिबीची परिस्थिती आणि त्यावर मात करण्यासाठी त्यांचे सातत्याने सुरू असलेले परिश्रम त्यांच्या काळ्या, मळकट पायांमधून लक्षात येतात.

## उतारा ९

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. खालील आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

**i.**

**पावडेकाका प्रवासाकरता वापरत असलेले वाहन**

१

**या वाहनाने प्रत्येक दिवशी केलेला प्रवास**

२

**ii.**

१ — **ॲपने दाखवलेले पावडेकाकांच्या फूटप्रिन्टसचे विशेष** — २

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २४,२५ वरील (ओळ ५४ ते ७४) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[सुमितनं पावडेकाकांचा डेटा....................... चेहरा एकदम पडला.]**

**२. कारणे लिहा.** **(२)**

i. पावडेकाका झाडं लावणारच नाहीत असे स्नेहल म्हणाली कारण .....

*ii. पावडेकाकांचा चेहरा पडला कारण .....

३. **व्याकरण**

**गटातील वेगळा शब्द ओळखा व तो शब्द वेगळा का आहे, यामागील कारण स्पष्ट करा.** (२)

i. ती, तुम्ही, ते, काका ii. वीस, निळा, पाऊलचिन्हे, काळीकुट्ट

४. **स्वमत** (२)

पब्लिक ट्रान्सपोर्ट आवश्यक आहे असे तुम्हांला वाटते का?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. कार २. पस्तीस-चाळीस किलोमीटर

ii. १. डर्टीएस्ट फूटप्रिन्टस २. पर्फेक्ट ब्लॅक फूटप्रिन्टस

**२.** i. पावडेकाकूंनी कुंडीतील रोपांकरता माती मागितली असता ती आणून देणेही पावडेकाकांना जमत नाही. त्यावरून ते झाड लावणारच नाहीत असे स्नेहलला वाटते.

ii. पावडेकाकांची माहिती सुमितने ॲपवर भरताच ॲपमधील निळ्या तुकड्यावर पावडेकाकांची काळीकुट्ट दोन पाऊलचिन्हे उमटली व त्याखाली 'सॉरी, यू हॅव, डर्टीएस्ट फूटप्रिन्टस, परफेक्ट ब्लॅक फूटप्रिन्टस' अशी अक्षरे उमटली.

**३.** i. काका – 'काका' हे नाम असून इतर सर्व सर्वनामे आहेत.

ii. पाऊलचिन्हे – 'पाऊलचिन्हे' हे नाम असून इतर सर्व विशेषणे आहेत.

**४.** हो. सध्याच्या युगात वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. खाजगी वाहनांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे. प्रत्येक जण अगदी थोड्या अंतरावर जाण्याकरताही वाहनाची मदत घेतो. त्यामुळे, ध्वनी प्रदूषण, वायू प्रदूषण यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. रहदारीचा प्रश्नही जटिल झाला आहे. त्याचा परिणाम जागतिक तापमानवाढीतून दिसून येतो. त्यामुळे या वाहनांचे, पर्यायाने होणाऱ्या प्रदूषणाचे प्रमाण घटवण्याकरता सार्वजनिक वाहने म्हणजेच पब्लिक ट्रान्सपोर्ट आवश्यक आहे. जर आपण पब्लिक ट्रान्सपोर्टचा अधिकाधिक वापर केला, तर त्यामुळे प्रदूषणाला आळा बसेल व इतर समस्यांवरही मात करता येईल.

SAMPLE CONTENT

## उतारा १०

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. खालील चौकटी पूर्ण करा.** **(२)**

i. उघड्या डोळ्यांना न दिसणाऱ्या ☐

ii. याच्या प्रमाणावरून आपल्या पावलांचा काळा रंग ठरतो. ☐

iii. प्रदूषण करून आपण या गोष्टीला हातभार लावतो. ☐

iv. तापानं फणफणलेली ☐

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २५ वरील (ओळ ७४ ते ८६) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[काय नाटक आहे ............................ आपल्याला धुवायला हवा.]**

**२. i. खालील घटनेचा परिणाम लिहा.** **(१)**

वीस किलोमीटर अंतर कारने येणे

**ii. एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

रेखामावशींची पावलं इतरांपेक्षा अधिक सुंदर चंदेरी का होती?

**३. व्याकरण**

**i. रिकाम्या जागी योग्य सर्वनाम वापरून वाक्य पूर्ण करा.** **(१)**

अ. सुमितनं त्यांच्या नाराज चेहऱ्याकडं पाहिलं आणि ________ समजावणीच्या सुरात बोलला. (तो, मी, ती, ते)

ब. आपल्या दैनंदिन जीवनात ________ किती कार्बन सोडतो हे मोजणारं हे ॲप आहे. (तुम्ही, त्या, ते, आपण)

**ii. कंसातील शब्दाला योग्य विभक्ती प्रत्यय लावून रिकाम्या जागेत भरा.** **(१)**

अ. ________ (रेखामावशी) रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वाव नाही.

ब. आपल्या ________ (पाय) चिकटलेला कार्बन आपल्याला धुवायला हवा.

**४. स्वमत** **(२)**

*"तापानं फणफणलीय आपली धरती" ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. कार्बन प्रिन्टस ii. कार्बन सोडण्याच्या

iii. ग्लोबल वॉर्मिंग iv. धरती

२. i. किमान एक लीटर पेट्रोल जळते म्हणजेच त्याच्या दुपटीहून अधिक कार्बन डायॉक्साइड वातावरणात सोडला जातो.

ii. रेखामावशींच्या रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वावच नव्हता, म्हणून त्यांची पावले इतरांपेक्षा अधिक सुंदर, चंदेरी होती.

३. i. अ. सुमितनं त्यांच्या नाराज चेहऱ्याकडं पाहिलं आणि **तो** समजावणीच्या सुरात बोलला.

ब. आपल्या दैनंदिन जीवनात **आपण** किती कार्बन सोडतो हे मोजणारं हे ॲप आहे.

ii. अ. **रेखामावशींच्या** रोजच्या जगण्यात कार्बन उत्सर्जनाला वाव नाही.

ब. आपल्या **पायाला** चिकटलेला कार्बन आपल्याला धुवायला हवा.

४. पृथ्वीतलावरचा प्रत्येक माणूस प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे प्रदूषणाला कारणीभूत ठरत आहे. या प्रदूषणामुळे ग्लोबल वॉर्मिंग होत आहे. पृथ्वीचे हे तापणे असेच सुरू राहिले, तर भविष्यात एक-ना-एक दिवस पृथ्वीचाच विनाश होईल. असे होऊ नये म्हणून आपण पुढे सरसावले पाहिजे. मागचा पुढचा विचार न करता केली जाणारी जंगलतोड प्राधान्याने थांबवली पाहिजे. धूर सोडणाऱ्या कारखानदारीवर नियम लावले पाहिजेत. प्रदूषण करणाऱ्या वाहनांची संख्या कमी करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. याव्यतिरिक्त, व्यक्तिगत पातळीवर वातानुकूलित यंत्र, शीतपेट्या, परफ्युम्स इत्यादी घातक वायू निर्माण करणाऱ्या साधनांचा वापर कमी करूनही आपण ग्लोबल वॉर्मिंगच्या प्रमाणात घट केली पाहिजे. प्रत्येकाने 'झाडे लावा झाडे जगवा' हे सूत्र आचरणात आणले पाहिजे. किमान एक झाड लावून वातावरण संतुलित करत तापानं फणफणलेल्या धरतीची अवस्था सुधारली पाहिजे.

## उतारा ११

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. खालील आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

**i.** १ — स्नेहल — **केलेले निश्चय** — अभिषेक — २

**ii.** १ — **आजकाल विस्मरणात गेलेल्या गोष्टी** — २

SAMPLE CONTENT

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २५ वरील (ओळ ८६ ते १०१) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[मी ठरवलंय ......................................... त्यांना भास झाला.]**

२. **योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** (२)

i. बसने प्रवास करणे आपल्याला .......
अ. मौजेचे वाटते. आ. कठीण वाटते.
इ. कमीपणाचे वाटते. ई. मोठेपणाचे वाटते.

ii. आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरता .......
अ. पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट. आ. गुड्स ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट.
इ. प्रायव्हेट वेहिकल इज अ मस्ट. ई. एअर ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट.

३. **व्याकरण**
**खालील वाक्यांचे सूचनेनुसार काळ बदला.** (२)
i. रेखामावशी सगळ्यांचे बोलणे लक्ष देऊन ऐकत होत्या. (भविष्यकाळ करा.)
ii. हिरव्यागर्द झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी उजळ होतील. (भूतकाळ करा.)

४. **स्वमत** (२)
* 'आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे, आपल्याला सहजपणे पुसता येत नाहीत', या विधानाचा तुम्हांला कळलेला अर्थ स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. १. कॉलेजला जाताना सायकलचा वापर करणार
२. बसने ये-जा करणार
ii. १. चालणं २. सायकल वापरणं

२. i. बसने प्रवास करणे आपल्याला **कमीपणाचे वाटते.**
ii. आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरता **पब्लिक ट्रान्सपोर्ट इज अ मस्ट.**

३. i. रेखामावशी सगळ्यांचे बोलणे लक्ष देऊन **ऐकतील.**
ii. हिरव्यागर्द झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी उजळ **झाली होती.**

SAMPLE CONTENT

४. दैनंदिन जीवनात अगदी नकळतपणे आपल्या हातून प्रदूषण होत असते. या प्रदूषणाची तिळमात्रही जाणीव आपल्याला नसते; मात्र त्याचे गंभीर परिणाम वातावरणावर होत असतात. जागतिक तापमानवाढ, पर्जन्यमानातील असंतुलन, आम्लपर्जन्य इत्यादी अनेक स्वरूपात आपली पावले वातावरणावर उमटलेली दिसतात. वातावरणावर झालेले हे परिणाम तात्पुरत्या स्वरूपाचे नसून ते दीर्घकाळ या वातावरणाला उपद्रव करत राहतात. त्यावर उपाययोजना करून हे प्रदूषण हटवण्याकरता फार मोठा कालावधी जावा लागतो. प्लास्टिकचा अवाजवी वापर, गाड्यांमधून बाहेर पडणारा धूर, कारखान्यांतून बाहेर येणारा धूर, सांडपाणी व त्यांमुळे होणारे प्रदूषण अनेक झाडे लावल्यानंतर तात्काळ नष्ट होत नाहीत. आपल्या मळलेल्या पावलांचे ठसे कापडाने लगेच पुसता येतात; मात्र हे प्रदूषणरूपी ठसे लागलीच पुसले जात नाहीत. त्यासाठी दीर्घकालीन उपाययोजनांची गरज असते.

# पाठ ८: ऊर्जाशक्तीचा जागर

## उतारा १२

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. i. लेखकाच्या निवासस्थानाच्या पत्त्याची आकृती पूर्ण करा. (१)**

गिरगाव → १ → देशमुख गल्ली → २ → पहिला माळा

**ii. योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. (१)**

**लेखकाच्या शाळेची परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र...**

अ. मनानं खूप कठोर होते. ब. मनानं खूप श्रीमंत होते.

क. मनानं खूप गरीब होते. ड. मनानं खूप मृदू होते.

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २८ वरील (ओळ क्र. ७ ते १९) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[आमचे मूळ गाव .......................... अनवाणीच राहावं लागलं.]**

**२. कारणे लिहा. (२)**

i. लेखक आणि त्याची आई मुंबईत आले कारण...

ii. लेखकाला 'शाळेत कसा जाऊ'? असा प्रश्न पडला कारण...

SAMPLE CONTENT

३. **व्याकरण**

**खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.(२)**

i. पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा अनुभवल्याच्या पुसटशा आठवणी माझ्या मनात येत असतात.

ii. आई कष्टाची कामे करत होती.

४. **स्वमत** **(२)**

बिकट परिस्थितीवर मात करत शिक्षण घेणाऱ्या एखादया विद्यार्थ्याशी तुम्ही परिचित आहात का? त्याचे वर्णन करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. खेतवाडी २. मालती निवास

ii. लेखकाच्या शाळेची परिस्थिती बेताचीच होती; पण इथले शिक्षक मात्र **मनानं खूप श्रीमंत होते.**

**२.** i. लेखक सहा वर्षांचा असताना त्याचे वडील वारले आणि उदरनिर्वाहाकरता त्याला व त्याच्या आईला माशेल हे मूळ गाव सोडावे लागले.

ii. वडील गेल्यानंतर लेखकाची आर्थिक परिस्थिती पूर्णपणे खालावली होती. त्यामुळे, लेखकाला कोणतीही फी भरणे शक्य नव्हते.

**३.** i. पिंपळकट्ट्यावर बसून निवांतपणा **अनुभवल्याची पुसटशी आठवण** माझ्या मनात येत **असते.**

ii. आई **कष्टाचे काम** करत होती.

**४.** हो. आमच्या इमारतीच्या मागच्या बाजूला असणाऱ्या झोपडपट्टीत शंभू हा एक १४-१५ वर्षांचा मुलगा राहतो. तो बाजारात दिवसभर भाजीची गाडी लावून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. वडिलांचे आजारपण, लहान बहिणीची जबाबदारी यांमुळे आईची होणारी तगमग पाहून त्याने चौथीतून नियमित शाळा सोडली. स्वत: काम करून कमवण्यास सुरुवात केली. शाळा सोडली; परंतु शिक्षणाच्या तळमळीने तो शिक्षणापासून मात्र दूर गेला नाही. त्याने रात्रशाळेत जाण्यास प्रारंभ केला. दिवसभर कष्ट करूनही तो नेहमी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होतो. त्याला आमच्यासारखा खेळायला वेळ मिळत नाही, याचे वाईट वाटते; पण आपल्या कष्टांनी तो स्वत:चे उत्तम भविष्य घडवेल याची खात्री वाटते. कोणतीही गोष्ट अशक्य नसते हे त्याच्याकडे बघून शिकायला मिळते.

SAMPLE CONTENT

## उतारा १३

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृतिबंध पूर्ण करा.** (२)

i.

१ — **अभ्यासामध्ये लेखकाला जाणवणाऱ्या अडीअडचणी** — २

*ii.

**युनियन हायस्कूलमधील शिक्षकांची वैशिष्ट्ये**
- १
- विद्यार्थ्यांना शिकवताना त्यामध्ये स्वत:ला झोकून देणे
- २

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २८-२९ वरील (ओळ क्र. २० ते ३१) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[शालेय शिक्षण पूर्ण ................................ ओढ वाटू लागली.]**

**२. i. चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. लेखकाची हायस्कूलची प्रवेश फी ☐

ब. लेखक माध्यमिक शिक्षण घेत असलेली शाळा ☐

***ii. कारण लिहा.** (१)

लेखकाला गिरगावातील नामांकित शाळांमध्ये प्रवेश मिळाला नाही कारण....

**३. व्याकरण**

i. 'इक' प्रत्यय असलेले कोणतेही दोन शब्द लिहा. (१)

उदा. माध्यमिक

ii. परिच्छेदातील कोणतीही दोन शब्दयोगी अव्यये शोधून लिहा. (१)

**४. स्वमत** (२)

*'माझ्या जीवनातील शिक्षकाचे स्थान' या विषयावर तुमचे विचार लिहा

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. १. छोट्याशा खोलीतील अपुरी जागा

२. अभ्यासाला पूरक वातावरणाची कमतरता

ii. १. शिक्षकांची सेवाभावी वृत्ती
 २. निरपेक्ष भावनेने केलेले मार्गदर्शन

**२.** i. अ. एकवीस रुपये ब. युनियन हायस्कूल

ii. हायस्कूलची प्रवेश फी एकवीस रुपये म्हणजेच लेखकाच्या मानाने खूप जास्त होती. या फीची व्यवस्था होईपर्यंत गिरगावातील नामांकित शाळांमधले प्रवेश बंद झाले होते.

**३.** i. आंतरिक, प्राथमिक ii. हायस्कूलमधले, आमच्याजवळ

**४.** प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात शिक्षकाचे असाधारण महत्त्व असते, त्याप्रमाणे माझ्याही जीवनात माझ्या शिक्षकांचे अढळ स्थान आहे. बालपणीची ४-५ वर्षे खेळण्या-बागडण्यात घालवून मी जेव्हा पहिल्यांदा शाळेत गेलो तेव्हा मी एका मातीच्या गोळ्यासमान होतो. कुंभार मातीला चांगला आकार देत सुबक मडकी घडवतो, त्याप्रमाणे माझे शिक्षक मला घडवत आहेत. छडी न उगारता आम्हा सर्वांवर उत्तम संस्कार करत आहेत. शिक्षकांनी दिलेला अभ्यासाचा, शिस्तबद्धतेचा, चिकाटीचा मंत्र जपत मी शिक्षणाचे पुढचे टप्पे गाठत आहे. आपल्या व्यक्तिमत्त्वाला छानसा आकार देण्यात, आपल्यामध्ये चांगले गुण रुजवण्यात शिक्षकांचा मोठा वाटा असतो, म्हणूनच माझ्या जीवनात शिक्षकांचे स्थान खूपच मानाचे आहे.

## उतारा १४

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृतिबंध पूर्ण करा.** **(२)**

**लेखकाच्या शैक्षणिक जीवनात शिक्षकांकडून लाभलेल्या गोष्टी**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. २९ वरील (ओळ क्र. ४३ ते ६०) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[याच हायस्कूलमध्ये ............................. शाळेत जाऊ लागतो.]**

**२. i. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

भावे सरांच्या प्रयोगांतून व त्यांच्या उपदेशातून लेखकाला मिळालेल्या गोष्टी

☐ व ☐

**ii. एका वाक्यात उत्तर द्या.** **(१)**

लेखकाचे संस्कार केंद्र कोणते होते?

**३. व्याकरण**

**विशेषण आणि विशेष्य यांच्या योग्य जोड्या लावा.** **(२)**

| | विशेषण | | विशेष्य |
|---|---|---|---|
| i. | उत्तम | अ. | शिदोरी |
| ii. | भरपूर | ब. | दारिद्र्य |
| iii. | शैक्षणिक | क. | मार्गदर्शन |
| iv. | प्रचंड | ड. | जीवन |

**४. स्वमत** **(२)**

*'भावे सरांचे शब्द हीच खरी माशेलकरांची ऊर्जा' या विधानाचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीसाठी उत्तम मार्गदर्शन व संस्कार
२. आयुष्याच्या उभारणीकरता भरपूर शिदोरी
३. संघर्षासाठी आत्मविश्वास
४. जगण्याचे भान

**२.** i. एकाग्रतेचा मंत्र, विज्ञानाचे ज्ञान
ii. लेखकाची आई, त्याचे शिक्षक व त्याची शाळा हे लेखकाचे संस्कार केंद्र होते.

**३.** (i – क), (ii – अ), (iii – ड), (iv – ब)

**४.** भावे सरांनी लेखकाला म्हणजेच डॉ. माशेलकरांना आयुष्याचे खरे तत्त्वज्ञान शिकवले. विज्ञानाच्या एका लहानशा प्रयोगातून त्यांनी जीवनाचे मोठे तत्त्वज्ञान लेखकाला सांगितले. सूर्याची शक्ती भिंगाच्या साहाय्याने एकवटून कागद सहजरीत्या जाळता येतो. त्याचप्रमाणे एकाग्रतेने लक्ष केंद्रित केल्यास आपण कोणतीही अशक्य वाटणारी गोष्ट सहज शक्य करू शकतो असे त्यांनी सांगितले. आपण एकाग्रता साधली, तर सर्व संकटांवर मात करत यश मिळवू शकतो, हे भावे सरांनी माशेलकरांना त्या प्रयोगातून पटवून दिले. या त्यांच्या कृतीतून माशेलकरांना एकाग्रतेचा मंत्र मिळाला व आयुष्यभरासाठी प्रेरणा मिळाली.

SAMPLE COPY

# पाठ १०: रंग साहित्याचे

## उतारा १५

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. खालील आकृती पूर्ण करा.** **(२)**

**कथेचे कोणतेही चार प्रकार**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३६ वरील (ओळ क्र. १४ ते २८) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[सुश्रुतः तुम्ही सगळे ................................ माझ्या यशाचं रहस्य.]**

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

i. कथेची वैशिष्ट्ये कोणती आहेत?

ii. कथेच्या यशाचे रहस्य काय आहे?

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्याला योग्य क्रियापद जोडून वाक्य पूर्ण करा.** **(१)**

अ. आजी मला रोज ससा-कासव यांच्या गोष्टी ...

ब. परीकथा, बोधकथा, विज्ञानकथा, ऐतिहासिक कथा हे कथेचे अनेक उपप्रकार ...

**ii. खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१)**

अ. कोल्हा ब. उंदीर

**४. स्वमत** **(२)**

तुम्हांला कशा प्रकारच्या कथा वाचायला आवडतात? सकारण लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. परीकथा २. बोधकथा ३. विज्ञानकथा ४. ऐतिहासिक कथा

**२.** i. आकर्षक सुरुवात आणि परिणामकारक शेवट ही कथेची वैशिष्ट्ये आहेत.

ii. उत्तम निवेदन तंत्रांचा वापर हे कथेच्या यशाचं रहस्य आहे.

३. i. अ. आजी मला रोज ससा-कासव यांच्या गोष्टी **सांगायची.**

ब. परीकशा, बोधकथा, विज्ञानकथा, ऐतिहासिक कथा हे कथेचे अनेक उपप्रकार **आहेत.**

ii. अ. कोल्ही ब. उंदरीण

४. मला कथा हा एकूण साहित्यप्रकारच फार आवडतो. लहान-सुटसुटीत असा हा साहित्यप्रकार मला भावतो. परीकथा, बोधकथा, विज्ञानकथा, ऐतिहासिक कथा, साहस कथा इत्यादी कथांचे विविध प्रकार आहेत. यांपैकी मला साहसकथा वाचायला खूप आवडते. वेगवेगळे धाडसी, थरारक अनुभव त्या कथेच्या वाचनातून अनुभवायला मिळतात. शौर्याने व प्रसंगी युक्तीचा वापर करत अवघड, बिकट परिस्थितीतून बाहेर पडण्यातला आनंद आपण वाचनातून अप्रत्यक्षपणे अनुभवत असतो. कथेतील नायक/ नायिकेसोबत आपणही त्या प्रसंगाला तोंड देत असतो. त्यामुळे, ते काल्पनिक विश्व अनुभवायला मजा येते, म्हणूनच साहसकथा वाचायला मला फार आवडते.

## उतारा १६

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. खालील आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

i. १ — रूप ← **कविता** → वैशिष्ट्य — २

ii. १ — **कवितेच्या शब्दरचनेचे विशेष** — २

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३७ वरील (ओळ क्र. ४४ ते ५५) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[कविता: सुश्रुत, ओळखलंस .................... चित्रपटात ऐकतोसुद्धा.]**

**२. i. योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.** **(१)**

संगीतकारांनी स्वरसाज चढवला, की कवितेचे...

अ. गाण्यात रूपांतर होते. ब. चित्रपटात रूपांतर होते.

क. पुस्तकात रूपांतर होते. ड. गाण्यात रूपांतर होत नाही.

**ii. एका वाक्यात उत्तर लिहा.** **(१)**

कवी कवितेचे बाह्यरूप व अंतरंग कसे सजवतात?

SAMPLE CONTENT

**३. व्याकरण**

**खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती लिहून तक्ता पूर्ण करा. (२)**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| i. | शब्दालंकारांनी | | |
| ii. | शब्दांत | | |

**४. स्वमत** **(२)**

कवितेची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. छोटंसं – आटोपशीर

२. मोजक्या शब्दांत मोठ्ठा आशय व्यक्त करणे

ii. १. अर्थपूर्ण २. चपखल

**२.** i. संगीतकारांनी स्वरसाज चढवला, की कवितेचे **गाण्यात रूपांतर होते.**

ii. कवी कवितेचे बाह्यरूप यमक, अनुप्रास अशा शब्दालंकारांनी, तर अंतरंग हे उपमा, उत्प्रेक्षा, रूपकासारख्या अर्थालंकारांनी सजवतात.

**३.**

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| i. | शब्दालंकारांनी | **नी** | **तृतीया** |
| ii. | शब्दांत | **त** | **सप्तमी** |

**४.** कविता म्हणजे अतिशय मोजक्याच शब्दांत गहन अर्थ सांगणारा साहित्यप्रकार होय. कविता हा मुक्तपणे लिहिलेला भावनांचा आविष्कार असतो. यात भाषिक नियमांचे फारसे बंधन नसते; मात्र अलंकारांची, प्रतीकांची, रूपकांची सुंदर गुंफण असते. दरवेळी कविता वाचताना कवितेचा अर्थ नव्याने उमगतो, कवितेची नवी बाजू समोर येते. त्यामुळे, कविता कितीही वेळा वाचली तरी ती जुनी, कंटाळवाणी वाटत नाही. कवितेतील शब्दांच्या चपखल गुंफणीतून अपेक्षित अर्थ कवी/ कवयित्री वाचकासमोर मांडते. 'जे न देखे रवी ते देखे कवी' असे म्हणतात ते खरे आहे. कवितेला आपली एक लय असते, ताल असतो. त्यामुळे, तिचे गाण्यातही रूपांतर होते. त्यामुळे, कविता हा मनाला भावणारा असा साहित्य प्रकार असून तो मनांवर राज्य करताना दिसतो.

SAMPLE CONTENT

## उतारा १७

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. ओघतक्ता पूर्ण करा.** **(२)**

| |
|---|
| **चरित्र निर्मितीतील टप्पे** |
| ↓ |
| १ |
| ↓ |
| २ |
| ↓ |
| **चरित्राचा जन्म होतो** |

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ३८ वरील (ओळ क्र. ८० ते ९४) वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.**
**[चरित्र: ए, सुश्रुत, ............................... माझे गाजलेले लेखक.]**

**२. i. खालील चौकटी पूर्ण करा.** **(१)**

अ. सामान्यांना प्रेरणा देणारी ☐

ब. मल्लिका अमर शेख, दया पवार, विश्राम बेडेकर इत्यादींनी हाताळलेला एक महत्त्वाचा साहित्यप्रकार ☐

***ii. फरक स्पष्ट करा.** **(१)**

| चरित्र | आत्मचरित्र |
|---|---|
| | |

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** **(१)**

अ. मॅडम <u>नेहमी</u> म्हणतात, की थोरांची चरित्रं सामान्यांना प्रेरणा देतात.

ब. <u>वा</u>! सर्व ताई-दादांनी मला किती माहिती दिली.

**ii. खालील वाक्यांतील काळ ओळखा.** **(१)**

अ. थोरांची चरित्रे सामान्यांना प्रेरणा देतात.

ब. अनेक प्रसिद्ध लेखकांनी चरित्र हा साहित्यप्रकार हाताळला.

**४. स्वमत** **(२)**

*तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.

SAMPLE

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. एखाद्या थोर व्यक्तिमत्त्वाच्या व्यक्तीचा लेखकावर प्रभाव पडतो.

२. त्याच्या आयुष्याची गाथा लिहिण्याची प्रेरणा लेखकाला मिळते.

**२.** i. अ. थोरांची चरित्रे  ब. आत्मचरित्र

ii.

| चरित्र | आत्मचरित्र |
|---|---|
| चरित्र म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या आयुष्याचे लेखकाने केलेले वर्णन होय. | आत्मचरित्र म्हणजे व्यक्तीने स्वत:च्या जीवनप्रवासाचे, त्यातील विविध टप्प्यांचे, वळणांचे, भल्याबुऱ्या अनुभवांचे तटस्थपणे केलेले वर्णन होय. |

**३.** i. अ. नेहमी – क्रियाविशेषण अव्यय

ब. वा! – केवलप्रयोगी अव्यय

ii. अ. वर्तमानकाळ

ब. भूतकाळ

**४.** मराठी भाषा समृद्ध अशा साहित्यप्रकारांनी नटलेली आहे. प्रत्येक साहित्यप्रकार आपली काही वैशिष्ट्ये घेऊन येतो. त्यामुळे, त्याचे वेगळेपण लक्षात राहते. साहित्यप्रकारातील ‘नाटक’ हा साहित्यप्रकार माझ्या आवडीचा आहे. यात संवादांच्या माध्यमातून एखादा विषय चपखलपणे हाताळला जातो. जेव्हा मी नाटक वाचतो त्यावेळी त्यातील प्रसंग प्रत्यक्ष समोर घडत असल्याचे जाणवते. त्यातील प्रत्येक पात्र आपलेसे वाटू लागते. त्या पात्राचे हावभाव, त्याच्या लकबी प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभ्या राहतात. संवादांच्या माध्यमातून एकेका पात्राचं व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उलगडत जातं. ते समजून घेणं मला फार आवडतं. शिवाय प्रसंग आणि संवाद सतत घडत असल्यामुळे त्यात जिवंतपणा, चैतन्य असते. या सर्वांमुळे मला नाटक हा साहित्यप्रकार फार आवडतो.

SAMPLE CONTENT

# पाठ ११: जंगल डायरी

## उतारा १८

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. खालील आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

i. **वाघिणीचे संभाव्य शत्रू**
- १
- बिबळा
- २

ii. **वाघिणीच्या पिल्लांचे विशेष**
- आकार – १
- वय – १

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ४३ वरील (ओळ क्र. ४७ ते ५८) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[वाघीण रात्रीच पिल्लांना.............................. खेळ सुरू झाले.]**

***२. कारणे लिहा.** **(२)**

i. वाघीण पिल्लांच्या सुरक्षेबाबत दक्ष होती कारण....

ii. वाघिणीने मंदपणे गुरगुरून नापसंती व्यक्त केली कारण ....

**३. व्याकरण**

**कंसातील सूचनेनुसार खालील वाक्यांचे काळ बदला.** **(२)**

i. वाघीण रात्रभर जंगलात फिरून पिल्लांजवळ परत आली होती. (भविष्यकाळ करा.)

ii. वाघिणीची पिल्ले लहान मुलांसारखी खेळकर होती. (वर्तमानकाळ करा.)

**४. स्वमत** **(२)**

*वाघीण आणि तिच्या पिल्लांची भेट हा प्रसंग शब्दबद्ध करा.

SA

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** i. १. नर वाघ    २. रानकुत्री

ii. १. कुत्र्यापेक्षा लहान    २. पाच महिने

**२.** i. जंगलात इतर नर वाघ, बिबळा, रानकुत्री यांसारख्या संभाव्य शत्रूंचा राबता असल्याने तिच्या पिल्लांना या भक्षकांपासून खूपच धोका होता.

ii. वाघीण रात्रभराच्या वाटचालीने थकून विश्रांती घेत असतानाच पिलाच्या धपकन पाण्यात पडण्यामुळे तिच्या तोंडावर पाणी उडाले.

३. i. वाघीण रात्रभर जंगलात फिरून पिल्लांजवळ परत **येईल.**

ii. वाघिणीची पिल्ले लहान मुलांसारखी खेळकर **आहेत.**

४. प्रस्तुत परिच्छेदामध्ये वाघीण व तिची पिल्ले यांच्या भेटीचा अनोखा प्रसंग लेखकाने नेमकेपणाने टिपला आहे. आपल्या पिल्लांच्या पालनपोषणाची जबाबदारी असलेल्या वाघिणीला म्हणजेच पिलांच्या आईला शिकारीला जावे लागते; मात्र आपल्या पिलांच्या सुरक्षेची योग्य व्यवस्था लावून मगच ती शिकारीला गेली. शिकारीहून परतल्यावर दमलेली वाघीण आपला थकवा विसरण्यासाठी पाण्यात बसली. तिची हाक ऐकताच तिची पिल्लं आई आल्याच्या आनंदात तिच्यावर झेपावली. जणू त्यांच्यातील हा काही काळाचा दुरावा त्यांना क्षणात नष्ट करायचा होता. आपल्या आईला पाहताच जणू त्यांच्यात निराळाच उत्साह संचारला होता. आता त्यांना कोणत्याही गोष्टीची भीती नव्हती. त्यामुळे, त्यांच्या दंग्याला जणू उधाणच आले होते.

## उतारा १९

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृतिबंध पूर्ण करा.** **(२)**

**वाघिणीने यांची शिकार साधलेली असण्याची शक्यता होती**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र.४३-४४ वरील (ओळ क्र.५९ ते ७०) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[मध्येच आई वळून ................................ हा अनुभव होता.]**

**२. कारणे लिहा.** **(२)**

i. वाघीण पिल्लांना शिकारीकडे घेऊन जात होती कारण...

ii. वाघिणीने आवाज दिल्यानंतरही दोन पिल्ले तिच्या मागे आली नाहीत कारण...

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांची जात ओळखा.** **(१)**

अ. थोडा वेळ बसल्यावर ती पटकन उभी राहिली.

ब. दोन पिल्ले तिच्या मागोमाग निघाली होती; पण दोघांना अद्याप भान नव्हतं.

**ii. खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१)**

अ. आई　　　　ब. वाघीण

**४. स्वमत** **(२)**

'लेखकाला वाघिणीतील मातृत्वाची झलक दिसली' हे विधान परिच्छेदाच्या आधारे स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. सांबर　　२. रानगवा
　३. नीलगाय　　४. रानडुक्कर

**२.** i. वाघिणीने केलेली शिकार जड असल्याने ती उचलून पिल्लांपर्यंत आणणे शक्य नव्हते.

ii. त्या दोन पिल्लांना तेव्हा भान नव्हते. ती पाण्यामध्ये एकमेकांसोबत खेळाचा आनंद लुटत होती.

**३.** i. अ. पटकन – क्रियाविशेषण अव्यय　　ब. पण – उभयान्वयी अव्यय

ii. अ. वडील　　ब. वाघ

**४.** लेखकाला जंगलात दिसलेली वाघीण व तिची पिल्ले, त्यांच्यातील भावबंधन त्यांनी आपल्या लेखातून आपल्यासमोर चित्रित केले आहे. वाघिणीसारख्या हिंस्र प्राण्यामध्ये लेखकाला आईची ममता दिसली व लेखकाने ती अचूक टिपून आपल्यासमोर मांडली. ज्याप्रमाणे माऊली आपल्या बाळांना गोंजारते, अगदी तशीच ही वाघीण आपल्या पिलांना मायेने चाटत असते. पिलांच्या पालनपोषणाविषयी सजग असल्यामुळे ती त्यांच्यासाठी शिकार करून त्यांना त्या शिकारीकडे घेऊन जाते. त्यासाठी त्यांना हाक मारून ती जाऊ लागते खरी, मात्र आपल्या पिल्लांच्या खोड्या माहीत असल्याने आणि त्यांच्या काळजीपोटी ती आई मागे वळून पाहते. आपली दोन पिल्ले अजूनही खेळत आहेत हे पाहून ती त्यांना पुन्हा साद घालते आणि आपल्या सर्व पिल्लांना सुरक्षितपणे घेऊन मगच तेथून बाहेर पडते. या गोड प्रसंगातून वाघिणीमधल्या जबाबदार, कर्तव्यदक्ष, मायाळू अशा आईची म्हणजेच मातृत्वाची झलक दिसून येते.

SAMPLE CONTENT

# पाठ १४: बीज पेरले गेले

## उतारा २०

**प्र.१.(अ)/(आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** (२)

**बालपणी लेखकाने केलेले कोणतेही चार उपद्व्याप**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५२ वरील (ओळ क्र. १ ते ११) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[माझ्या बालमित्रांनो, ........................... आईच्या प्रेमळ कुशीत.]**

**२. i. खालील घटना/कृतींचे परिणाम लिहा.** (१)

संध्याकाळी लेखक घरी येईपर्यंत त्याच्याबद्दलच्या अनेक तक्रारी आईच्या कानांवर आलेल्या असायच्या.

***ii. कारण लिहा.** (१)

दुसऱ्या मुलांच्या हातांत खेळणी पाहून लेखकाला लहानपणी त्यांचा हेवा वाटत असे कारण...

**३. व्याकरण**

**i. खालील वाक्यांतील कोणतीही दोन नामे लिहा.** (१)

गरीब कुटुंबाच्या वाट्याला येणारे सारे कष्ट व दु:खे आम्ही भोगत होतो.

**ii. 'कर' हा प्रत्यय लागलेले परिच्छेदातील दोन शब्द लिहा.** (१)

**४. स्वमत** (२)

बिकट परिस्थितीमध्ये लहान-लहान गोष्टीही पुरेसा आनंद देऊन जातात, असे तुम्हांला वाटते का?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. १. विटीदांडू खेळणे   २. पतंग उडवणे
   ३. कॅम्पमधील कॅनॉलमध्ये चोरून पोहणे
   ४. कैऱ्या आणि पेरू पाडून त्यांचा यथेच्छ स्वाद घेणे

२. i. परिणामी, लेखकाने घरात पाय ठेवताच त्याच्या पाठीवर धम्मकलाडू व चापटपोळ्या यांचा यथेच्छ वर्षाव त्याच्या आईकडून केला जात असे.

ii. लेखकाचे वडील पोलीसखात्यात तुटपुंज्या पगारावर नोकरी करत असल्याने गरिबीमुळे त्यांना मुलांसाठी खेळणी विकत घेता येत नव्हती.

३. i. कुटुंब, कष्ट ii. खेळकर, खोडकर

४. हो निश्चितच! ज्याप्रमाणे वाळवंटामध्ये एखादा हिरवागार वृक्ष आनंद देऊन जातो त्याप्रमाणे अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत लहानशी गोष्टही मोठा आनंद देऊन जाते. मुळात आनंद घेण्याची प्रवृत्ती मानवाच्या अंगी असणे आवश्यक असते. मग ती गोष्ट लहान असो वा मोठी, त्यामागच्या आनंद शोधणे महत्त्वाचे असते. या आनंदाला परिस्थितीची बंधने नसतात. गरज असते ती मोकळ्या मनाची. लेखकाची परिस्थिती बिकट असूनही लहान-लहान गोष्टींमधून तो आनंद घेताना, खोड्या करताना दिसतो. यातून आपल्या लक्षात येते, की बिकट परिस्थितीतही रडत न बसता लहान-लहान गोष्टींमधून आनंद मिळवता येतो.

## उतारा २१

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. ओघतक्ता तयार करा.** (२)

**लाजेने मान खाली गेली**

↓

[ ]

↓

[ ]

↓

[ ]

↓

[ ]

↓

**विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी लेखकाच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली.**

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५३ वरील (ओळ क्र. ४८ ते ५८) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**[ही मॅच पाहिल्यावर तिचा ...................... आणि उगवले ते असे.]**

SAMPLE CONTENT

**२. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

i. खेळाडूंचा स्वाक्षऱ्या देण्याचा सोहळा पाहून लेखकाच्या मनात काय आले?

ii. लेखकाच्या काळजाला कोणते दृश्य भिडले?

**३. व्याकरण**

**i. 'परि' उपसर्ग असलेले कोणतेही दोन शब्द लिहा.** **(१)**

उदा. परिणाम

**ii. खालील वाक्यांतील शब्दयोगी अव्यये ओळखा व लिहा.** **(१)**

अ. तेव्हापासून स्वाक्षरीच्या तालमीला सुरुवात झाली.

ब. माझे नाव मोठ्या अक्षरांत शाळेच्या बोर्डावर झळकले.

**४. स्वमत** **(२)**

ज्याप्रमाणे लेखकाचे नाव मोठ्या अक्षरांत शाळेच्या बोर्डावर झळकले तसे तुमच्या बाबतीत कधी घडले आहे का?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. थोड्याच दिवसांनी लेखकाने आंतरशालेय सामन्यात १०० धावा केल्या.

२. तेव्हा सर्वांच्या डोळ्यांत कौतुकांचे भाव उमटले.

३. ते पाहण्यासाठी लेखकाची मान अभिमानाने वर झाली.

४. लेखकाचे नाव मोठ्या अक्षरांत शाळेच्या बोर्डावर झळकले.

**२.** i. खेळाडूंचा स्वाक्षऱ्या देण्याचा सोहळा पाहून आपणही एक मोठे खेळाडू व्हावे असे लेखकाच्या मनात आले.

ii. मॅच संपल्यानंतर खेळाडूंच्या स्वाक्षऱ्या घेण्यासाठी जी झिम्मड उडते, तेव्हाचे दृश्य लेखकाच्या काळजाला भिडले.

**३.** i. परिपूर्ण, परिवार

ii. अ. तेव्हा<u>पासून</u>   ब. बोर्डा<u>वर</u>

**४.** हो. मी आठवी इयत्तेत शिकत असताना विज्ञानप्रदर्शनात भाग घेतला होता. त्यावेळी पवनऊर्जानिर्मिती प्रकल्पाची प्रतिकृती मी तयार केली होती. त्या प्रतिकृतीला राज्यस्तरावर पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. ही आमच्या शाळेकरता व गावाकरता मोठी अभिमानाची गोष्ट होती. आमच्या लहानशा शाळेचे नाव राज्यात सगळीकडे झाले होते. परिणामी, ही बातमी

SAMPLE CONTENT

शाळेत व गावात पोहोचताच सगळीकडे आनंदाची लाट पसरली. गावातील सर्वांनाच माझे कौतुक वाटले. शाळेतही शिक्षकांनी शाबासकी दिली. शाळेत माझा छोटासा सत्कारसमारंभ ठेवण्यात आला होता. त्यासाठी शाळेत प्रवेश करताच प्रथम नजर गेली ती शाळेच्या सूचनाफलकाकडे. सजावट केलेल्या त्या फलकावर माझे नाव मोठ्या अक्षरांत, रंगीत खडूने लिहिले होते. माझे कौतुक करणारी वाक्ये खाली लिहिली होती. ते पाहून मला आणि माझ्या कुटुंबियांनाही फार आनंद झाला.

# पाठ १५: खरा नागरिक

## उतारा २२

**प्र.१.(अ)/(आ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

१. **आकृती पूर्ण करा.** (२)

**सकाळची वेळ अभ्यासाला योग्य असण्याची कोणतीही चार कारणे**

१ | २ | ३ | ४

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५५ वरील (ओळ क्र. ४ ते १३) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[पहाटेची, सकाळची ................................ मावशीचं घर होतं.]**

२. i. **चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. निरंजनची यांच्यावर श्रद्धा होती. [ ]

ब. निरंजन यांच्या घरी राहत होता. [ ]

ii. **कारण लिहा.** (१)

निरंजन हा गुरुजींचा लाडका विद्यार्थी होता कारण .....

३. **व्याकरण**

i. **खालील शब्दांचे वचन बदला.** (१)

अ. सल्ला    ब. गणित

SAMPLE CONTENT

**ii. खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये ओळखा व लिहा. (१)**

अ. दुरून एखादी भूपाळी किंवा रेडिओवरचं आवडतं भक्तिगीत ऐकू येत असते.

ब. तो त्यांचा लाडका विद्यार्थी होता कारण तो अतिशय प्रामाणिकपणे काम करायचा.

**४. स्वमत (२)**

अभ्यासाकरता कोणती वेळ तुम्हांला योग्य वाटते? सकारण लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. सकाळच्या टवटवीत आणि प्रसन्न वातावरणात अभ्यास खूप छान होतो.

२. शरीरानेही पुरेशी विश्रांती घेतल्याने ते ताजेतवाने बनलेले असते.

३. आल्हाददायक वातावरणात संस्कृतचा श्लोक चटकन पाठ होतो.

४. न कळलेले गणित चटकन कळून त्याची रीत लक्षात राहते.

**२.** i. अ. भडसावळे गुरुजी

ब. दूरच्या नात्यातली मावशी

ii. निरंजन अतिशय प्रामाणिकपणे काम आणि अभ्यासही करत असे.

**३.** i. अ. सल्ले ब. गणिते

ii. अ. किंवा ब. कारण

**४.** अभ्यास उत्तम व्हावा याकरता मनाची एकाग्रता महत्त्वाची ठरते आणि मनाची एकाग्रता तेव्हाच होते जेव्हा मन प्रसन्न असते. त्यामुळे, पहाटेची वेळ ही अभ्यासाकरता उत्तम असते असे माझे मत आहे. दिवसभराची धावपळ, शाळा, शिकवण्या, गृहपाठ, खेळ, मनोरंजन या सगळ्या गोष्टींनी शरीर आणि मन दोघेही थकतात. त्यामुळे, मनाला एक प्रकारची मरगळ येते; मात्र सकाळी जेव्हा आपण उठतो त्यावेळी शरीराचा आणि मनाचा थकवा, मरगळ सारे काही दूर झालेले असते. नव्या दिवसाला सामोरे जाण्याची पूर्ण ताकद आणि प्रसन्नता या पहाटेच्या वेळी तना-मनाला जाणवत असते. त्यामुळेच, अशा प्रसन्न वेळी, ताज्यातवान्या वृत्तीने केलेला अभ्यास दीर्घकाळ स्मरणात राहतो. नव्या विचारांच्या, माहितीच्या साठवणुकीसाठी मेंदू सज्ज असल्याने या वेळी अभ्यास करणे केव्हाही उत्तम असते असे मला वाटते.

SAMPLE CONTENT

## उतारा २३

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. निरंजनच्या दिनक्रमाचा ओघतक्ता तयार करा.** **(२)**

| |
|---|
| **सकाळी लवकर उठायचा** |
| ↓ |
| १ |
| ↓ |
| २ |
| ↓ |
| ३ |
| ↓ |
| ४ |
| ↓ |
| **संध्याकाळी मावशीकडे जे काही मिळेल त्यावर राहायचा** |

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५५ वरील (ओळ क्र.१३ ते २४) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[आईवडील लहानपणीच ............................ अभ्यास करायचा.]**

**२. i. आकृती पूर्ण करा.** **(१)**

| | | |
|---|---|---|
| १ | **भडसावळे गुरुजींनी निरंजनला केलेली मदत** | २ |

***ii. खालील घटनेचा परिणाम लिहा.** **(१)**
निरंजनचा परीक्षेत पहिला नंबर यायचा.

**३. व्याकरण**

**i. गटातील वेगळा शब्द ओळखा व तो शब्द वेगळा का आहे, यामागील कारण स्पष्ट करा.** **(१)**
दररोज, प्रगती, लवकर, झटून

**ii. 'दर' हा उपसर्ग असलेले कोणतेही दोन शब्द लिहा.** **(१)**
उदा. 'दररोज'

**४. स्वमत** **(२)**
वार लावण्याची पद्धत ही बिकट परिस्थितीमध्ये शिक्षण घेणाऱ्यांकरता मोलाचा हातभार लावत असे यावर तुमचे मत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

**१.** १. घरातली, गोठ्यातली सारी कामं आटपायचा.
२. अभ्यासाला बसायचा.
३. दररोज दुपारी एकाच्या घरी पाहुणा म्हणून जेवायला जायचा.
४. तेथून शाळेत जायचा.

**२.** i. १. थोरामोठ्यांच्या घरी वार लावून देणे
२. निरंजनचा वह्या-पुस्तकांचा खर्च उचलणे

ii. त्याची शिक्षणातील प्रगती पाहून भडसावळे गुरुजी त्याच्या वह्या-पुस्तकांचा खर्च उचलत व वेगवेगळ्या घरी जेवणासाठी वार लावून देत.

**३.** i. प्रगती – कारण 'प्रगती' हे नाम असून इतर सगळे शब्द हे क्रियाविशेषण अव्यये आहेत.

ii. दरवर्षी, दरवेळी

**४.** वार लावणे म्हणजे शिक्षणासाठी घराबाहेर पडलेल्या गरीब व्यक्तींची जेवणाची आबाळ होऊ नये याकरता थोरामोठ्यांच्या घरी जेवणासाठी लावलेली पाळी होय. यामुळे, शिक्षणासाठी धडपडणाऱ्या एखाद्या निर्धन विद्यार्थ्याची रोजच्या अन्नाची सोय होत असे. परिणामी, तो निश्चिंत होऊन अभ्यासावर, शिक्षणावर लक्ष केंद्रित करू शकत असे. मुळातला रोजच्या अन्नाचा प्रश्न सुटल्यामुळे बिकट परिस्थितीतही अंतिम ध्येय साध्य करण्याची हिंमत व ताकद मिळत असे. शिवाय, वेगवेगळ्या घरी रोज वार लावलेला असल्याने त्या घरांवरही फारसा ताण पडत नसे. अशाप्रकारे, समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बळांना साहाय्य करण्याची ही पद्धत त्यांना शिक्षण घेण्यासाठी नक्कीच हातभार लावत असे.

## उतारा २४

**प्र.१.(अ)/(आ). खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

**i.** १ — **जिल्हाधिकाऱ्यांनी निरंजनला दिलेल्या सवलती** — २

**ii.** **मावशीच्या घराकडे आलेली मोठमोठी माणसं**
१
२
**भडसावळे गुरुजी**

SAMPLE CONTENT

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ५७ वरील (ओळ क्र. ६८ ते ७६) वाचा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**
**[दुसऱ्या दिवशीच्या .................................... डोळे पाणावले.]**

२. i. **चौकटी पूर्ण करा.** (१)
अ. निरंजनला याचे श्रेय देण्यात आले. [ ]
ब. निरंजन या विषयाच्या खऱ्याखुऱ्या परीक्षेत पास झाला. [ ]

ii. **कारण लिहा.** (१)
निरंजन नागरिकशास्त्राच्या खऱ्याखुऱ्या परीक्षेत पास झाला कारण .....

३. **व्याकरण** (२)
**कंसात दिलेल्या सूचनेनुसार काळ बदला.**
i. भीषण अपघात टाळल्याचं श्रेय त्यालाच देण्यात आलं होतं. (भविष्यकाळ करा.)
ii. शाळेचे सगळे अधिकारी आले आहेत. (भूतकाळ करा.)

४. **स्वमत** (२)
निरंजन नागरिकशास्त्राच्या खऱ्याखुऱ्यापरीक्षेत पास झाला असे भडसावळे गुरुजींनी का म्हटले असावे?

## उत्तरे

**प्र.१.(अ)/(आ).**

१. i. १. सरकारी वसतिगृहात प्रवेश
२. वह्यापुस्तकांच्या खर्चासाठी शिष्यवृत्ती

ii. १. जिल्हाधिकारी
२. शाळेचे मुख्याध्यापक

२. i. अ. भीषण अपघात टाळण्याचे
ब. नागरिकशास्त्र

ii. निरंजनने शेकडो माणसांचा जीव वाचवून उत्तम नागरिकाचे कर्तव्य बजावले होते.

३. i. भीषण अपघात टाळल्याचं श्रेय त्यालाच देण्यात **येईल.**

ii. शाळेचे सगळे अधिकारी आले **होते.**

SAMPLE

४. नागरिकशास्त्र या विषयातून आपण नागरिकांचे अधिकार, त्यांची कर्तव्ये शिकत असतो; मात्र पुस्तकी शिक्षणाचा अवलंब आपल्या दैनंदिन जीवनात करणे तितकेच महत्त्वाचे असते. ही गोष्ट समजून निरंजनने आपला स्वार्थ टाळून इतरांचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य असल्याचे जाणले व योग्य वेळी आपले कर्तव्य बजावत त्याने अनेकांचे जीव वाचवले. त्याच्या एका कृतीमुळे शेकडो माणसांचा जीव वाचला. यामध्ये त्याचा नागरिकशास्त्राचा पेपर बुडाला; पण त्याने नागरिकशास्त्रात शिकलेल्या मूल्यांचा आपल्या प्रत्यक्ष जीवनात अंगीकार केला. त्यामुळेच, निरंजन नागरिकशास्त्राच्या खऱ्याखुऱ्या परीक्षेत पास झाला असे भडसावळे गुरुजींनी म्हटले.

## अपठित गद्य उतारे – प्र.१.(इ)

### प्रश्नाचे स्वरूप

कृतिपत्रिकेत गद्य विभागात **प्र.१. (इ)** मध्ये ८ गुणांसाठी एक अपठित म्हणजेच पाठ्यपुस्तकाबाहेरील उतारा देण्यात येईल. येथे विकल्प (Option) देण्यात येणार नाही. या ८ गुणांची कृतीनिहाय विभागणी व त्यात विचारण्यात येणारे प्रश्नप्रकार पुढीलप्रमाणे:

**१. आकलन कृती** **२ गुण**

**२. आकलन कृती** **२ गुण**

वरील दोन्ही कृतींमध्ये 'आकृती पूर्ण करा', 'चौकटी पूर्ण करा', 'ओघतक्ता पूर्ण करा', 'तक्ता पूर्ण करा', 'एका शब्दात उत्तर लिहा', 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा', 'योग्य जोड्या जुळवा', 'कारणे लिहा', 'घटनेचा / कृतीचा परिणाम लिहा', 'एका वाक्यात उत्तर लिहा', '_ असे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा', 'तुलना करा', 'फरक लिहा' यांसारख्या वैविध्यपूर्ण कृतीपैकी कोणत्याही कृती विचारल्या जाऊ शकतील.

**३. व्याकरण कृती** **२ गुण**

या कृतीमध्ये दिलेल्या परिच्छेदात आलेल्या इयत्ता पहिली ते नववीच्या व्याकरण घटकांवर आधारित कृती विचारण्यात येतील.

**४. स्वमत** **२ गुण**

विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना देणारे, अभिव्यक्ती क्षमता व विचारांची मांडणी जोखणारे प्रश्न येथे विचारण्यात येतील.

SAMPLE CONTENT

**लक्षात ठेवा:**

१. दिलेला उतारा दोन वेळा वाचा.
२. सर्व कृती काळजीपूर्वक वाचा.
३. उत्तरांना योग्य क्रमांक द्या.
४. परीक्षेत आकलन व व्याकरणावर आधारित आकृती पेनने काढणे अपेक्षित आहे.
५. 'योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा / योग्य पर्याय निवडा' ह्या कृतीच्या उत्तरात विद्यार्थ्यांनी पूर्ण विधान लिहिणे अपेक्षित आहे.
६. 'योग्य जोड्या जुळवा' या कृतीच्या उत्तरात प्रत्यक्ष जोडी लिहिणे अपेक्षित आहे.

## उतारा १

**प्र.१.(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** (२)

**साने गुरुजींनी पार पाडलेल्या विविध भूमिका**

| १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|

"बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो" अशी देशाच्या वैभवाची दुर्दम्य आकांक्षा उराशी बाळगणारे प्रखर देशभक्त म्हणजे पांडुरंग सदाशिव साने. म्हणजेच आपले साने गुरुजी. स्वातंत्र्यसैनिक, समाजवादी विचारवंत, समाजसुधारक, मराठी साहित्यिक अशा विविध भूमिकांमधून साने गुरुजींनी आपले अवघे जीवन देशासाठी समर्पित केले. आपल्या देशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जडणघडणीमध्ये त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. हळव्या, सरळ मनाच्या साने गुरुजींचे भारतीय संस्कृतीवर अतिशय प्रेम होते. त्यामुळेच, भारतीय समाजातील जातिभेद, अस्पृश्यता अशा अनिष्ट प्रथा नष्ट व्हाव्यात यासाठी त्यांनी अखंडपणे लढा दिला. साधी, रसाळ, ओघवती आणि संस्कारक्षम भाषाशैली हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आहे. 'श्यामची आई' या त्यांच्या पुस्तकाने वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. या कादंबरीवर आधारित आचार्य अत्रे यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटाला १९५४ मध्ये केंद्र सरकारकडून पहिला 'राष्ट्रीय पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले. देशातील विविध राज्यांतील लोकांनी एकमेकांची भाषा, संस्कृती जाणून घ्यावी, विचारांच्या देवाणघेवाणीतून आसेतुहिमाचल भारत खऱ्या अर्थाने जोडला जावा, यासाठी गुरुजींनी

SAMPLE CONTENT

'आंतरभारती' ही चळवळ सुरू केली. 'राष्ट्र सेवा दल' या संस्थेची स्थापना करून त्यांनी राष्ट्रभक्त तरुण घडवण्याचे कार्य केले. प्रसिद्ध साहित्यिक पु.ल. देशपांडे यांनी "ह्या जगामध्ये असुरांच्या सृष्टीत सुरांचे राज्य निर्माण व्हावे म्हणून ज्यांनी प्रयत्न केले त्यात गुरुजींचे स्थान आधुनिक काळात तरी अनन्यसाधारण आहे. अजोड आहे," असे गौरवोद्गार साने गुरुजी यांचे वर्णन करताना काढले आहेत.

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

i. साने गुरुजींच्या लेखनाची वैशिष्ट्ये कोणती?

ii. साने गुरुजींच्या कोणत्या पुस्तकाने वाचकमनावर अधिराज्य गाजवले?

**३. खालील विशेष्य आणि विशेषणांच्या योग्य जोड्या लावा.** **(२)**

| | विशेषण | | विशेष्य |
|---|---|---|---|
| i. | प्रखर | अ. | आकांक्षा |
| ii. | संस्कारक्षम | ब. | देशभक्त |
| iii. | अनिष्ट | क. | प्रथा |
| iv. | दुर्दम्य | ड. | भाषाशैली |

**४. स्वमत** **(२)**

'असुरांच्या सृष्टीत सुरांचे राज्य निर्माण करण्याकरता साने गुरुजींनी महान कार्य केले' असे पु.ल.देशपांडे यांनी का म्हटले असावे? तुमच्या शब्दांत लिहा.

## उत्तरे

**प्र.१.(इ).**

**१.** १. स्वातंत्र्यसैनिक २. समाजवादी विचारवंत

३. समाजसुधारक ४. मराठी साहित्यिक

**२.** i. साधी, रसाळ, ओघवती आणि संस्कारक्षम भाषाशैली ही साने गुरुजींच्या लेखनाची वैशिष्ट्ये होत.

ii. साने गुरुजी लिखित 'श्यामची आई' या पुस्तकाने वाचकमनावर अधिराज्य गाजवले.

**३.** (i – ब), (ii – ड), (iii – क), (iv – अ)

**४.** सुर म्हणजे 'देवता' तर असुर म्हणजे 'राक्षस'. साने गुरुजींच्या काळात म्हणजेच स्वातंत्र्यपूर्व कालखंडात जातिभेद, अनिष्ट रुढी, अज्ञान, अंधश्रद्धा फोफावल्या

SAMPLE CONTENT

होत्या. त्यामुळे, मानवाचे मानवासोबतचे वागणे बदलले होते. मानवाने आपल्यातील माणूसपण सोडल्याने त्यांच्यात असुरी प्रवृत्ती वाढीस लागली होती. माणसातील हे तुटलेपण दूर करण्यासाठी अतिशय कोमल, हळव्या, शुद्ध, मनाच्या साने गुरुजींनी अनेक प्रयत्न केले. यासाठी त्यांनी आपल्या लेखणीचा वापर करून मानवातील चांगुलपणा जागृत करण्याचा प्रयत्न केला. शांत, संयमी, ज्ञानी, समजुतदार माणसांची निर्मिती करून त्यांच्या हाती देश सोपवण्याकरता त्यांनी 'आंतभारती' 'राष्ट्रीय सेवा दल' इत्यादी संस्थांद्वारे प्रयत्न केला, म्हणूनच असुरांच्या सृष्टीत सुरांचे राज्य निर्माण करण्याचे प्रयत्न साने गुरुजींनी केले असे पु.ल. देशपांडे म्हणतात.

## उतारा २

**प्र.१.(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** (२)

**संगीत म्हणजे**

१ | २ | ३ | ४

संगीत ही आपल्या मनाला अतीव शांती आणि समाधान देणारी कला आहे. या सृष्टीच्या चराचरामध्ये संगीत भरले आहे; मात्र ते ऐकण्यासाठी आपण निसर्गाशी एकरूप होणे गरजेचे आहे. निसर्गाचा आवाज ऐकण्याची कला ज्याला साधली त्याला जीवनातील आनंदाचा ठेवा गवसला असे म्हणावे लागेल. नदीचे खळाळत वाहणे, ढगांचा गडगडाट, विजेचा कडकडाट, पानांची सळसळ, पक्ष्यांचा किलबिलाट, वेळूच्या बनातून शीळ घालत वाहणारा वारा, समुद्राच्या लाटांची गाज या साऱ्यांमधून निसर्ग आपल्याशी संवाद साधत असतो. निसर्गाचे हे संगीत आपल्या मनामध्ये आनंद, भय, हुरहुर, समाधान असे अनेकविध भाव निर्माण करते. भारतीयांनी निसर्गाला नेहमीच आपला मित्र मानले. या मित्राचे हितगुज एकाग्रपणे ऐकण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच, संगीत ही आपल्याला निसर्गाकडून लाभलेली स्वाभाविक देणगी आहे. निसर्गामधील विविध ध्वनींमधूनच भारतीय शास्त्रीय संगीतातील सप्तसूर गवसले असे म्हटले जाते. भारतीय शास्त्रीय संगीतातील स्वरांचा संबंध निसर्गातील विविध ध्वनींशी जोडला आहे. सा, रे, ग, म या स्वरांचा संबंध अनुक्रमे मोराचा केकारव (ओरडणे), चातक पक्ष्याचा आपल्या जोडीदाराला साद घालण्याचा आवाज, शेळीचा ओरडण्याचा

आवाज आणि करकोच्याचा आवाज यांच्याशी जोडला आहे, तर प, ध आणि नि यांचा संबंध अनुक्रमे कोकिळेची कुऽहुऽ, घोड्याचे खिंकाळणे आणि हत्तीचे ओरडणे यांच्याशी जोडला आहे. कोणत्याही देशातील संगीत हे देशाचे वैभव असते; किंबहुना संगीत हे मानवी समाजाच्या सांस्कृतिक परंपरेचे संचित आहे.

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

i. निसर्गाच्या संगीतामुळे आपल्या मनामध्ये कोणते भाव निर्माण होतात?

ii. मानवाला निसर्गातील विविध ध्वनींमधून काय गवसले आहे?

**३. i. खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये शोधा व लिहा.** **(१)**

अ. संगीत ही आपल्या मनाला अतीव शांती आणि समाधान देणारी कला आहे.

ब. भारतीयांनी निसर्गाला आपले मित्र मानले म्हणून त्यांनी या मित्राचे हितगुज एकाग्रपणे ऐकण्याचा प्रयत्न केला.

**ii. खालील शब्दांचे लिंग बदला.** **(१)**

अ. कोकीळ ब. मोर

**४. स्वमत** **(२)**

ज्याप्रमाणे निसर्ग आणि संगीताचे अतूट नाते आहे तसे इतर कोणत्या कलेचे निसर्गाशी नाते आहे असे तुम्हांला वाटते?

## उत्तरे

**प्र.१.(इ).**

**१.** १. मनाला अतीव शांती आणि समाधान देणारी कला

२. निसर्गाकडून लाभलेली स्वाभाविक देणगी

३. देशाचे वैभव

४. मानवी समाजाच्या सांस्कृतिक परंपरेचे संचित

**२.** i. निसर्गाच्या संगीतामुळे आपल्या मनामध्ये आनंद, भय, हुरहुर समाधान असे भाव निर्माण होतात.

ii. मानवाला निसर्गातील विविध ध्वनींमधून भारतीय शास्त्रीय संगीतातील सप्तसूर गवसले आहेत.

**३.** i. अ. आणि ब. म्हणून

ii. अ. कोकिळा ब. लांडोर


SAMPLE CONTENT

४. माझ्या मते प्रत्येक कला ही निसर्गातूनच उत्पन्न होत असल्याने तिचे निसर्गाशी असलेले नाते अतूटच असते. या कलांपैकी चित्रकला ही निसर्गाचा आविष्कार असलेली एक कला आहे. पावसाळ्यात धरणीने धारण केलेली हिरवळ, अथांग आकाशाची गर्द निळाई, विविधरंगी फुलांनी केलेली रंगांची उधळण, सूर्योदय, सूर्यास्ताच्या वेळी आकाशात परसलेल्या लाल-तांबूस रंगछटा या साऱ्या चित्रकलेमागील प्रेरणा असाव्यात. चित्रकलेच्या सुरुवातीच्या अवस्थेत मानव निसर्गातून मिळणाऱ्या रंगांचा वापर करत असे. मोठे मोठे दगड, गुहांमधील भिंती यांवर चितारलेल्या या नैसर्गिक आविष्कारातून चित्रकलेचा उदय झाला. त्यामुळे, निसर्गातून जन्मलेली व निसर्गाला रेखाटणारी ही कला निसर्गाबरोबरील आपले अतूट नाते स्पष्ट करते.

## उतारा ३

**प्र.१.(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** **(२)**




अधिकार आणि कर्तव्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. अधिकार बजावताना व्यक्ती मुख्यत: स्वत:चा विचार करताना दिसते, तर कर्तव्य बजावताना व्यक्ती स्वत: पलीकडे जाऊन दुसऱ्याचा विचार करते. देशाच्या, समाजाच्या, कुटुंबाच्या भल्याकरता कर्तव्याची जाण आणि अधिकाराचे भान या दोन्हींमध्ये तारतम्य राखणे गरजेचे आहे. एका स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राचे नागरिक म्हणून आपल्याला अनेकानेक अधिकार आहेत; पण त्याचबरोबर त्याला जोडून येणारी कर्तव्य पार पाडणे हीदेखील आपली जबाबदारी आहे. दुर्दैवाने आपल्या अधिकारांबाबत आपण जेवढे जागरूक आहोत तेवढे आपल्या कर्तव्यांबद्दल जागृत असतोच असे नाही. अधिकार मागण्यासाठी सहज संघटित होणारे आपण कर्तव्याची भाषा आल्यावर मात्र आपली जबाबदारी झटकून टाकतो. गुळगुळीत आणि दर्जेदार रस्ते, सुंदर, सुशोभित, आकर्षक उद्याने, चोवीस तास अखंडितपणे होणारा वीज आणि पाणीपुरवठा हे सारे मिळणे एक नागरिक म्हणून आपले अधिकार आहेत. ते मिळवण्यासाठी आपण संघटित होतो; पण वाहतुकीचे नियम पाळणे, उद्यानांमध्ये स्वच्छता राखणे, वीज, पाण्याचा काळजीपूर्वक

वापर करणे ही कर्तव्य मात्र आपण सोयीस्करपणे विसरून जातो. साधे मतदानाचे कर्तव्य बजावण्यासाठीदेखील आपण पुढाकार घेत नाही. असे का व्हावे? आपल्यामध्ये देशभक्तीचा अभाव तर निर्माण झाला नाही ना? नाहीतर कोणताही देशभक्त नागरिक आपल्या देशाप्रतीचे कर्तव्य बजावताना एवढी बेपर्वाई दाखवणे शक्यच नाही. आपण सर्वांनीच देशाप्रतीची आपली कर्तव्ये निभावण्यासाठी अंतर्मुख होणे गरजेचे आहे.

**२. चौकटी पूर्ण करा.** **(२)**

i. याची अंमलबजावणी करताना व्यक्ती मुख्यत: स्वत:चा विचार करते. ☐

ii. याची अंमलबजावणी करताना व्यक्ती स्वत:पलीकडे जाऊन दुसऱ्याचा विचार करते. ☐

iii. नागरिकांचा कोणताही एक अधिकार ☐

iv. आपण प्रत्येकाने देशाप्रतीची आपली कर्तव्ये निभावण्यासाठी याची गरज आहे. ☐

**३. दिलेल्या सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे काळ बदला.** **(२)**

i. एका स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राचे नागरिक म्हणून आपल्याला अनेकानेक अधिकार आहेत. (भूतकाळ करा.)

ii. मतदानाचे कर्तव्य बजावण्यासाठीदेखील आपण पुढाकार घेत नाही. (भविष्यकाळ करा.)

**४. स्वमत** **(२)**

तुम्ही तुमची कोणकोणती कर्तव्ये पार पाडता असे तुम्हांला वाटते?

## उत्तरे

**प्र.१.(इ).**

**१.** १. वाहतुकीचे नियम पाळणे
२. उद्यानांमध्ये स्वच्छता राखणे
३. वीज-पाणी यांचा काळजीपूर्वक वापर करणे
४. मतदान करणे

**२.** i. अधिकार
ii. कर्तव्ये
iii. अखंडित वीजपुरवठा
iv. अंतर्मुख होणे

SAMPLE CONTENT

३. i. एका स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्राचे नागरिक म्हणून आपल्याला अनेकानेक अधिकार होते.

ii. मतदानाचे कर्तव्य बजावण्यासाठीदेखील आपण पुढाकार घेणार नाही.

४. मी वयाने लहान असलो तरी माणूस म्हणून अनेक अधिकार मी हक्काने बजावतो. या अधिकारांबरोबर येणाऱ्या कर्तव्यांची जाणीवही मला आहे. त्यामुळे, प्रत्येक टप्प्यावर मी ती पार पाडण्याचा प्रयत्न करतो. मी पाण्याचा, विजेचा काळजीपूर्वक वापर करतो, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखतो, कचरा नेहमी कचरापेटीतच टाकतो, आधाराची गरज असलेल्या दिव्यांग व्यक्तींना शक्य तेवढी मदत करतो, मुक्या प्राण्यांची काळजी घेतो, मोठ्यांचा आदर करतो, मोठ्यांनी सांगितलेल्या गोष्टी आचरणात आणतो, वेळेचे बंधन पाळतो, घरी आईला मदत करतो, आई आजारी असल्यास तिची काळजी घेतो, आजी-आजोबांना बागेत फिरायला नेतो, पर्यावरणाची हानी होणार नाही याची काळजी घेतो, प्लॅस्टिकचा वापरही टाळतो. अशा विविध गोष्टी करून मी माझी काही कर्तव्ये पार पाडण्याचा प्रयत्न करतो.

## उतारा ४

**प्र.१.(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृती पूर्ण करा.** (२)

**'माजुली' बेटाची कोणतीही चार वैशिष्ट्ये**

१ | २ | ३ | ४

कैलास पर्वत आणि मानससरोवराच्या आग्नेय दिशेला असलेल्या आंग्सी या हिमनदीतून ब्रह्मपुत्रा ही नदी उगम पावली आहे. तिबेटमध्ये उगम पावणारी ही नदी प्रथम भारतातील अरुणाचल प्रदेश राज्यात प्रवेश करते आणि त्यानंतर ती असाम राज्यातून वाहत जाते. आसाम राज्यामध्ये या नदीच्या पात्रात 'माजुली' हे बेट आहे. हे बेट गेल्या पाच शतकांपासून आसामची 'सांस्कृतिक' राजधानी म्हणून ओळखले जाते. नदीपात्रातील जगातील सर्वांत मोठे बेट म्हणून 'गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये या बेटाची नोंद करण्यात आली आहे. विविध वनस्पती, पक्षी आणि प्राणी अशा विपुल सृष्टीवैभवाने नटलेल्या या बेटाला आसाम सरकारने जिल्ह्याचा दर्जा दिला आहे.

SAMPLE CONTENT

पाण्याची मुबलक उपलब्धता, गाळाची सुपीक मृदा यांमुळे या बेटाला शेतीची समृद्ध परंपरा लाभली आहे. येथे भात या पिकाच्या शंभर जाती पिकवल्या जातात. विशेष म्हणजे कोणतेही कृत्रिम संकरित बियाणे किंवा रासायनिक खते न वापरता पूर्णपणे नैसर्गिकपणे ही शेती केली जाते. शेती खालोखाल वस्त्रोद्योग हा येथील प्रमुख व्यवसाय असून मुगा या रेशमाचे उत्पादन घेतले जाते. हे रेशीम सोनेरी रंगाचे असते. १४४ गावे असलेल्या या बेटावर सध्या सुमारे दीड लाख लोकांचे वास्तव्य आहे. येथे मिशींग, आसामी आणि देवरी या भाषा प्रामुख्याने बोलल्या जातात.

२. i. **चौकटी पूर्ण करा.** (१)

अ. माजुली बेटावर या प्रकारच्या रेशमाचे उत्पादन होते [ ]

ब. 'माजुली' बेटावर बोलली जाणारी एक भाषा [ ]

ii. **कारण लिहा.** (१)

'माजुली बेटाला शेतीची समृद्ध परंपरा लाभली आहे' कारण .....

३. **व्याकरण**

i. **'इक' प्रत्यय लागलेले कोणतेही दोन शब्द परिच्छेदातून शोधून लिहा.**

उदा. सांस्कृतिक (१)

ii. **खालील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखा.** (१)

१४४ गावे असलेल्या या बेटावर सध्या सुमारे दीड लाख लोकांचे वास्तव्य आहे.

४. **स्वमत** (२)

तुम्ही भेट दिलेल्या एखादया निसर्गरम्य ठिकाणाचे तुमच्या शब्दांत वर्णन करा.

## उत्तरे

**प्र.१.(इ).**

**१.** १. आसामची सांस्कृतिक राजधानी

२. गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डनुसार नदीपात्रातील जगातील सर्वांत मोठे बेट

३. विपुल सृष्टीवैभवाने नटलेले

४. शेतीची समृद्ध परंपरा लाभलेले

**२.** i. अ. 'मुगा' ब. मिशींग



SAMPLE CONTENT

ii. माजुली बेटावर मोठ्या प्रमाणात पाण्याची उपलब्धता असल्याने व येथील गाळाच्या सुपीक मृदेमुळे या बेटाला शेतीची समृद्ध परंपरा लाभली आहे.

३. i. रासायनिक, नैसर्गिक

ii. सध्या – क्रियाविशेषण अव्यय

आहे – क्रियापद

४. काही महिन्यांपूर्वी मी व माझे कुटुंबीय माथेरानला फिरायला गेलो होतो. पावसाळ्याचे दिवस असल्याने संपूर्ण माथेरान जणू हिरवा शालू नेसून उभे होते. रायगडमधील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या या माथेरानचे पावसाळ्यात दिसणारे रूप काही औरच! हिरवी गर्द, गच्च झाडी, त्यातून मध्येच किलबिलाट करणारे पक्षी, मातीमधून मळलेल्या पायवाटा, पावसाची संततधार, घोड्यांच्या पावलांचा आवाज आणि खोल, हिरवळीने नटलेल्या दऱ्या, त्यातून वाहणारे फेसाळते धबधबे यांमुळे माथेरान अधिक मनात भरते. माथेरानचे वेगवेगळ्या दिशांनी वैविध्यपूर्ण दर्शन घडवणारे पॉईंटस व वाहने नसणे यांमुळे हा प्रदेश मनाला शांतता देऊन जातो. काही जुन्या वास्तुशैली असलेल्या इमारतीही लक्षवेधक ठरतात. मानवाच्या अवाजवी हस्तक्षेपापासून दूर असलेला हा प्रदेश मनाला आनंद व उत्साह देऊन जातो.

## उतारा ५

**प्र.१.(इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**१. आकृत्या पूर्ण करा.** **(२)**

**i.**

- १ — **कुस्तीचे प्रकार** — २

**ii.**

**प्रतिष्ठेची कुस्तीची स्पर्धा**

- १ — राष्ट्रीय स्तरावरील
- महाराष्ट्रातील — २

कुस्ती या अस्सल भारतीय क्रीडाप्रकाराला पूर्वी मल्लयुद्ध म्हणून संबोधले जात असे. महाभारतामध्ये मल्लयुद्धाचा उल्लेख आढळतो. यावरून हा क्रीडाप्रकार किती पुरातन आहे याची कल्पना येते. महाराष्ट्रातील कोल्हापूर हे शहर 'कुस्तीची पंढरी' म्हणून ओळखले जाते. या शहरात राजर्षी शाहू महाराजांनी कुस्तीला राजाश्रय दिला.

SAMPLE CONTENT

त्यामुळे, येथील तांबड्या मातीच्या आखाड्यात हा क्रीडाप्रकार बहरला, विकसित झाला. याच क्रीडाप्रकारात खाशाबा जाधव यांनी १९५२ मध्ये भारताला स्वातंत्र्योत्तर काळातील पहिलेवहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदक जिंकून दिले. मातीच्या आखाड्यातील कुस्ती आणि मॅटवरील कुस्ती हे कुस्तीचे दोन प्रकार आहेत. यांपैकी पहिला प्रकार आता काहीसा मागे पडत चालला आहे कारण ऑलिंपिक आणि अन्य आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये आता प्रामुख्याने मॅटवरील कुस्तीच खेळली जाते. 'हिंद केसरी' ही भारतातील राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठेची कुस्ती स्पर्धा मानली जाते, तर 'महाराष्ट्र केसरी' ही महाराष्ट्रातील प्रतिष्ठेची स्पर्धा मानली जाते. प्रामुख्याने पुरुषांसाठीचा समजल्या जाणाऱ्या या खेळामध्ये गेल्या काही वर्षांपासून मुलींनीही बाजी मारली आहे. साक्षी मलिकने २०१६ च्या रिओ ऑलिंपिक स्पर्धेत कुस्तीमध्ये कांस्यपदक पटकावून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. गीता व बबिता फोगट या हरियाणातील भगिनींनी कुस्तीमध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी घेतलेली कठोर मेहनत आणि वडील महावीर फोगट यांची खंबीर साथ या विषयावर आधारित 'दंगल' हा चित्रपट प्रचंड लोकप्रिय ठरला. या चित्रपटाने भारतातील खेड्यापाड्यांतील अनेक मुलींच्या मनात कुस्तीमध्ये प्राविण्य मिळवण्याची ऊर्मी जागवली, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

२. **i. चौकटी पूर्ण करा.** **(१)**

अ. 'कुस्तीची पंढरी' म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्रातील शहर ☐

ब. १९५२ मध्ये भारताला पहिले ऑलिंपिक पदक जिंकून देणारे ☐

**ii. कारणे शोधा व लिहा.** **(१)**

कोल्हापुरात तांबड्या मातीत कुस्ती हा क्रीडाप्रकार बहरला, विकसित झाला, कारण...

३. **व्याकरण**

**i. खालील वाक्यांतील उभयान्वयी अव्यये ओळखा.** **(१)**

अ. मातीच्या आखाड्यातील कुस्ती हा प्रकार आता काहीसा मागे पडत चालला आहे, कारण ऑलिंपिक, अन्य आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये मॅटवरील कुस्तीच खेळली जाते.

ब. गीता व बबिता फोगट या हरियाणातील भगिनींनी कुस्तीमध्ये प्राविण्य मिळवण्यासाठी कठोर मेहनत घेतली.

**ii. खालील शब्दांचे लिंग बदला.** (१)

अ. भगिनी ब. पुरुष

**४. स्वमत** (२)

मैदानी खेळांचे महत्त्व तुमच्या भाषेत स्पष्ट करा.

## उत्तरे

**प्र.१.(इ).**

**१.** i. १. मातीच्या आखाड्यातील कुस्ती

२. मॅटवरील कुस्ती

ii. १. हिंद केसरी २. महाराष्ट्र केसरी

**२.** i. अ. कोल्हापूर ब. खाशाबा जाधव

ii. कोल्हापुरात राजर्षी शाहू महाराजांनी कुस्तीला राजाश्रय दिला होता.

**३.** i. अ. कारण ब. व

ii. अ. बंधू ब. स्त्री

**४.** आजच्या संगणकीय युगात मैदानी खेळ खेळण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. त्यामुळे, या मैदानी खेळांचे महत्त्व जाणून घेणे आवश्यक ठरते. मैदानी खेळ शरीर व मनाचे स्वास्थ्य उत्तम राखण्यास मदत करतात. या खेळांमुळे शरीराचा व्यायाम होऊन शरीर सुदृढ होण्यास मदत होते. सतत क्रियाशील राहिल्यामुळे अंगात चपळता येते. शिवाय, खेळल्यामुळे आनंद मिळून मन ताजेतवाने होण्यास मदत होते. खिलाडूवृत्ती निर्माण होऊन नेतृत्वगुणाचाही विकास साधला जातो. संघभावना अंगी रुजली जाते. व्यक्ती अधिक समाजशील बनते. अशा या मैदानी खेळांचा सर्वप्रकारे मानवाला फायदाच होतो.

SAMPLE CONTENT

# SSC ekdum Tension Free

with

# IQB Important Question Bank

Based on New Paper Pattern of Maharashtra State Board

Books for English, Marathi & Semi-English Medium




## AVAILABLE SUBJECTS:

- English
- Hindi (Entire)
- Hindi (Composite)
- Marathi
- Maths - 1
- Science - 1
- Maths - 2
- Science - 2
- Geography
- History

**BUY NOW**

## SALIENT FEATURES:

- A compilation of the Most Important Questions
- A great resource for Quick Revision
- Covers a wide variety of Questions as per the flow of Paper Pattern
- Answers framed as per the allocation of marks
- Includes Model Question Paper for self evaluation
- Inclusion of QR Codes for students to access videos on the 'Latest Paper Pattern', as prescribed by the Board as well as 'Answer Key' for the Model Question Paper

Target Publications Pvt. Ltd.

88799 39712 / 13 / 14 / 15

mail@targetpublications.org

www.targetpublications.org